## जी ७ परिषद : पंतप्रधान मोदींनी साधला संवाद



**रोम :** भारताचे पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेतलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जी ७ परिषदेसाठी गुरुवारी रात्री इटलीला पोहचले. त्यांनी अपुलिया येथे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेस्की, ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतली. या वेळी द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे रशिया-युक्रेन युद्धादरम्यान पंतप्रधान मोदी हे दुसऱ्यांदा युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेस्की यांना भेटले. या बैठकीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी युद्धाबाबत भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. कोणताही संघर्ष हा संवादातूनच सोडवला जाऊ शकतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. याशिवाय पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांचीही भेट घेतली व विविध विषयांवर चर्चा केली.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३२८

www.ramprahar.com

शनिवार, १५ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


'त्या' आईस्क्रिमसंदर्भात कंपनीचे थर्ड पार्टीकडे 'बोट'/२

मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश देतो सांगून फसवणूक/५

अफगाणिस्तानची टी-२० वर्ल्डकपच्या सुपर ८मध्ये धडक/८


# विधानसभा निवडणुकीत विजय मिळवू

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास




**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपच्या महाराष्ट्र आणि मुंबईच्या पदाधिकाऱ्यांची बैठक शुक्रवारी (दि. १४) दादर येथील वसंत स्मृती कार्यालयात झाली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीत आपण विजय मिळवू, असा आत्मविश्वास व्यक्त केला.

या बैठकीला केंद्रीय मंत्री पियुष गोयल, भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, मंत्री, खासदार, आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आभाळ कोसळलेले नाही. १३० विधानसभा मतदारसंघात आपली आघाडी आहे. ध्रुवीकरण प्रचंड झाले आणि आपली संख्या कमी झाली. संविधान बदलणार हा नरेटिव्ह तयार करण्यात आला होता. पहिल्या तीन टप्प्यात ही तीव्रता अधिक असल्याने २४पैकी केवळ चार जागा मिळाल्या. नंतर आपण त्याला प्रतिवाद केला आणि पुढच्या २४ जागांपैकी १३ जागा मिळाल्या.

फक्त विश्लेषण करून चालत नाही. रणनीतीसुद्धा हवी. त्यासाठी प्रामाणिक आत्मपरीक्षण करावे लागते. मुंबईच्या कार्यकर्त्यांनी मनावर घेतले आहे आणि येथे विजयाचा नवीन संकल्प पहायला मिळाला, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. **(पान २ वर..)**

# खासदार निलेश लंकेंनी घेतली कुख्यात गुंड गजा मारणेची भेट

### पुण्यात सत्कारही स्वीकारला; सर्व स्तरांतून टीका

**पुणे : प्रतिनिधी**

नगर दक्षिणचे नवनिर्वाचित खासदार निलेश लंके यांनी कुख्यात गुंड गजा मारणे याची भेट घेतली. खासदार लंके पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी गुंडाची भेट घेतल्याने सर्व स्तरांतून त्यांच्यावर टीका होत आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंकेंनी गुरुवारी कुख्यात गुंड गजा मारणे याच्या निवासस्थानी जाऊन त्याची भेट घेतली. या वेळी गजा मारणेने लंकेंचा सत्कार केला. लंके यांनी हा सत्कार स्वीकारला. त्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील



राष्ट्रवादीचे नेते अमोल मिटकरी यांनी हल्लाबोल केला आहे. 'आज निलेश लंके सन्मानाने सत्कार स्वीकारत आहेत. बारामती अथवा अहमदनगर लोकसभेमध्ये ज्या घडामोडी घडल्या, गुंडाचा वापर झाला. यामध्ये गजा मारणेचा सपोर्ट होता का? हे तपासले पाहिजे, असे मिटकरी म्हणाले.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या विद्या चव्हाण यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, गजा मारणे याची भेट घेणे चुकीचेच आहे. निलेश लंके यांनी त्यांची भेट का घेतली? याबाबत मी त्यांच्याशी चर्चा करेन. कोणताही लोकप्रतिनिधी असो गुन्हेगारीचा सत्कार स्वीकारणे चुकीचे आहे. हे त्यांनी का केले? त्यांच्याकडून ही चूक कशी झाली? याबाबत विचारेन.

दरम्यान, टीकेचा भडीमार सुरू झाल्यानंतर लंके यांनी ही भेट हा केवळ अपघात होता. मी चूक मान्य करतो, अशी सारवासारव केली आहे.

## राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन २७ जूनपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबई येथे २७ जून ते १२ जुलै या कालावधीत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल. मुंबई विधानभवन येथे विधानसभा आणि विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक शुक्रवारी (दि. १४) झाली. या वेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे) यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

अधिवेशनात एकूण १३ दिवस कामकाज चालणार आहे. २९ जून या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामकाज सुरू राहील.

# पनवेल कोळीवाड्यातील शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून पनवेल कोळीवाडा येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि. १४) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले तसेच जो विश्वास ठेवून आपण पक्षप्रवेश केला आहे तो सार्थ ठरेल, अशी ग्वाही दिली.



श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, शहर अध्यक्ष अनिल भगत, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, अमित ओझे, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, विनायक मुंबईकर यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी पनवेल येथील कोळीवाड्यातील शेकापचे दिलीप शेलार, कृष्णा शेलार, अमृत भोईर, राम शेलार, प्रभाकर शेलार, विघ्नेश शेलार, राहुल शेलार, कैलास भगत, शंकर भोईर, किरण भोईर, संतोष पाटील, सनी भोईर, विजय भोईर, रोहित म्हात्रे, योगेश शेलार, संतोष शेलार, महादू शेलार, साहिल शेलार, हर्षद शेलार, अरविंद भोईर, दर्शन शेलार, साहिल शेलार यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

## निवडक

### अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिर उडवण्याची धमकी दहशतवाद्यांनी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने अयोध्येतील राम मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी दिली आहे. दहशतवाद्यांच्या धमकीमुळे अयोध्या प्रशासन अलर्ट मोडवर आले असून राम मंदिर आणि विमानतळाच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

### अमेरिकेत पीएनजी ज्वेलर्सवर दरोडा; पाच जणांना अटक

**सॅन फ्रान्सिस्को :** अमेरिकेत पीएनजी ज्वेलर्सवर दरोडा टाकण्यात आला आहे. तब्बल २० दरोडेखोरांनी मध्यरात्री दुकानात घुसून दागिने लुटले. लुटीनंतर दरोडेखोर पळून जात असताना पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून पाच जणांना अटक केली. मागील सहा आठवड्यात बे परिसरात दरोडा टाकण्यात आलेले हे तिसरे भारतीय ज्वेलर्सचे दुकान आहे. त्यामुळे अमेरिकेतील भारतीय ज्वेलर्सना टार्गेट केले जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## नागपूर चामुंडी कंपनी स्फोटप्रकरणी मालक आणि व्यवस्थापकाला अटक

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूरमधील धामना येथील चामुंडी एक्स्प्लोसिव्ह कंपनीत गुरुवारी झालेल्या भीषण स्फोटात सहा जणांचा जीव गेला. या प्रकरणात पोलिसांनी कंपनीचा मालक जय शिवशंकर खेमका आणि व्यवस्थापक सागर देशमुख यांना अटक केली आहे. या दोघांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धामना येथील चामुंडी एक्स्प्लोसिव्ह कंपनीत गुरुवारी दुपारी सव्वा वाजताच्या सुमारास मोठा स्फोट झाला. या कंपनीत गनपावडरपासून सेफ्टी फ्युज व मायक्रोकॉर्डचे उत्पादन केले जात होते. स्फोटात पन्नालाल बंदेवार, शीतल आशीष चटक, प्रांजली श्रीकांत फलके, वैशाली आनंदराव क्षीरसागर, मोनाली शंकर अलोने, प्रांजली किसन मोदरे यांचा मृत्यू झाला, तर प्रमोद मुरलीधर चवारे, श्रद्धा वनराज पाटील, दानसा फुलनसा मरसकोल्हे हे गंभीर जखमी झाले आहेत.

या स्फोटामुळे धामना व परिसरात आक्रोश तसेच संतापाचा सूर होता. या प्रकरणात पोलिसांनी कंपनीचे मालक जय शिवशंकर खेमका आणि व्यवस्थापक सागर देशमुख यांच्याविरोधात कलम २८६, ३०४-अ व ३३८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कंपनीचे संचालक व व्यवस्थापकांनी कामगारांना योग्य सुरक्षा यंत्रणा न पुरविल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

### नातेवाईकांचा उद्रेक

घटनेच्या दुसऱ्याही दिवशी धामना परिसरातील रस्त्यांवर मोठ्या संख्येने जमाव जमला होता. त्यांच्याकडून कंपनीसह प्रशासनाच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. मृत्यू झालेल्यांना तातडीने मदत न मिळाल्यास आंदोलनाचाही इशारा जमावाकडून दिला गेला. दरम्यान, अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा परिसरात बंदोबस्त होता.

# रायगडात ५४ हजार २०८ पदवीधर मतदार

### जिल्ह्यातील मतदारसंख्येत तिपटीने वाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २६ जून रोजी मतदान होत आहे. २०१८च्या तुलनेत या वेळी या मतदारसंघात पदवीधर मतदारांची संख्या दुपटीने वाढली आहे, तर रायगड जिल्ह्यात तिपटीने मतदार नोंदणी झाली आहे. २०१८मध्ये रायगडात सुमारे १९ हजार पदवीधर मतदार होते, तर या वेळी ५४ हजार २०८ मतदारांची नोंदणी झाली आहे.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मतदार नोंदणीच्या अंतिम मुदतीपर्यंत कोकण पदवीधर मतदारसंघात मतदार संख्या वाढवण्यात जिल्हा प्रशासनाला यश आले आहे. सर्वाधिक नोंदणी पनवेल



तालुक्यात झाली आहे. पनवेल तालुक्यात २० हजार ७१ मतदार आहेत.

रायगड जिल्ह्यात पुरुष मतदार ३० हजार ८४३, महिला २३ हजार ३४३ आणि तृतीयपंथी नऊ असे एकूण ५४ हजार २०८ मतदार आहेत. दरम्यान, कोकण पदवीधर मतदारसंघात २८ मे २०२४पर्यंत रोजीची एकूण मतदारसंख्या दोन लाख १३ हजार ९१७ इतकी आहे. सन २०१८ची कोकण या मतदारसंघातील एकूण मतदार नोंदणी ही एक लाख चार हजार ४८८ इतकी होती.

**तालुकानिहाय मतदार**

पनवेल २०,०७१, उरण ३८२५, कर्जत ३८७५, खालापूर २७७१, पेण ६५१३, अलिबाग ४२४२, सुधागड ११९१, रोहा ३९९३, मुरूड १०४९, तळा ३२४, माणगाव २१६६, म्हसळा ५९१, श्रीवर्धन ६६३, महाड ३२४५, पोलादपूर ६८६.

**"कोकण पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे महाविद्यालये, शासकीय कार्यालये, डॉक्टर, वकील संघटनांसाठी विशेष शिबिरे घेण्यात आली. त्याचबरोबर पदवीधर मतदार नोंदणीसाठी पोस्टर्स, बॅनर्स आणि झिंगल्स तयार करण्यात आली होती. पदवीधर मतदार याद्या सातत्याने अद्ययावत करण्यात येत होत्या. त्यामुळे या वेळी रायगड जिल्ह्यात चांगल्या प्रकारे पदवीधर मतदार नोंदणी झाली आहे.**

**-स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक), रायगड**

# घटक पक्षांच्या सहकार्यामुळे निवडून आलो -खासदार तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक चुरशीची होईल असे सर्व म्हणत होते, परंतु महायुतीमधील सर्व घटक पक्षांमध्ये एकोपा निर्माण झाला. घटक पक्षांतील नेते व कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम केले. त्यामुळे मोठ्या मताधिक्याने मी निवडून आलो. यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेणमध्ये घेतलेली सभा महत्त्वाची ठरली, असे रायगडचे नवनिर्वाचित खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले. अलिबाग येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात शुक्रवारी (दि.१४) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार अनिकेत तटकरे, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते,




राष्ट्रवादी काँग्रेसचे अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक, अलिबाग तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत, हर्षल पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, माझ्या विजयासाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी झोकून देऊन काम केले. मनसे, आरपीआयनेही सहकार्य केले. त्याचबरोबर जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांनी माझ्या विजयासाठी हातभार लावला.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाने हुरळून जाणार नाही. आगामी विधानसभा निवडणुका महायुती म्हणून एकत्रित लढणार आहोत. जिल्ह्यातील सातही मतदारसंघात महायुती विजयी होण्यासाठी प्रयत्न करणार. रत्नागिरी जिल्ह्यात पाचही विधानसभा मतदारसंघात महायुतीला फटका बसला आहे. त्या ठिकाणी आम्हाला अधिक मेहनत घ्यावी लागणार, असे खासदार सुनील तटकरे यांनी म्हटले.

### विविध प्रश्न सोडवणार

रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्ग, सागरी महामार्ग, रेल्वेसंदर्भातील विविध प्रश्न, उद्योग आणि रोजगार निर्मिती, पर्यटन विकासाचे प्रश्न सोडवण्याचा आगामी काळात प्रयत्न करणार असल्याचे खासदार सुनील तटकरे या वेळी म्हणाले. रायगड जिल्हा परिषद आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवीन इमारतीबाबत लवकरच ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## शीना बोरा हत्याकांडातील मोठा पुरावा गायब

**मुंबई :** हायप्रोफाईल शीना बोरा हत्याकांड पुन्हा चर्चेत आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी जप्त केलेला महत्त्वाचा पुरावा गायब झाला आहे. सरकारी वकिलांनी याबाबत मुंबईच्या विशेष सीबीआय कोर्टात याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी जो सांगाडा शीनाचा म्हणून जप्त केला होता, तो आणि हाडे गायब झाली आहेत.

इंद्राणी मुखर्जी, तिचा पहिला पती संजीव खन्ना व ड्रायव्हर श्यामवर रायने २०१२मध्ये शीनाची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर मृतदेह रायगड जिल्ह्यातील पेणमध्ये आणून जाळला होता. सांगाडा गायब झाल्याने जेजे रुग्णालयातील फॉरेन्सिकतज्ज्ञ डॉ. जेबा खान यांचा जबाब पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यास सरकारी वकिलांनी तयारी दर्शवली आहे.

# अनुस्कुरा घाटात दरड कोसळली

### कोल्हापूर-कोकण वाहतुकीवर परिणाम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पावसाला नुकतीच कोठे सुरुवात झाली असताना दरडी कोसळण्याचे प्रकार घडू लागले आहेत. रत्नागिरीतील अनुस्कुरा घाटामध्ये गुरुवारी (दि. १३) दरड कोसळली. यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण मार्गाला होणारी या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अथक परिश्रमाअंती दुसऱ्या दिवशी दरड हटविण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्याला जोडणाऱ्या राजापूर तालुक्यात गुरुवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. अशातच अनुस्कुरा घाटात सायंकाळी साडेसहा वाजता दरड कोसळली. यामुळे रस्ता बंद झाल्याने या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली.

दरम्यान, घाटातील रस्त्यात सायंकाळी कोसळलेली दरड आणि माती काढून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तत्काळ प्रयत्न सुरू झाले. मोठ मोठे दगड आणि दरडीचा भाग जास्त प्रमाणात कोसळल्याने मार्ग मोकळा करण्यासाठी वेळ लागला, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता स्वप्नील बावधनकर यांनी दिली.

गत आठवड्यात मान्सून सक्रिय झाला असून तेव्हापासून राजापूर तालुक्यामध्ये कमी-जास्त प्रमाणात पाऊस होत आहे. मागच्या २४ तासांत तालुक्यात पावसाचा जोर वाढल्याने बाकाळे येथे घरांचे नुकसान झाले तर सायंकाळी उशिरा अनुस्कुरा घाटात दरड कोसळल्याची घटना घडली. कोकणामध्ये ये-जा करण्यासाठी शॉर्टकट मार्ग म्हणून या घाटमार्गाची ओळख आहे. राजापूर तालुक्यातील अनेकजण कोल्हापुरात याच मार्गाने दळणवळणासाठी याच मार्गाचा वापर करतात. घाटात दगड आणि मोठ्या प्रमाणात माती रस्त्यावर आल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद झाला होता. दुसऱ्या दिवशी मार्ग मोकळा करण्यात सार्वजनिक बांधकाम खात्याला यश आले. पावसाळ्यात घाटात अशा घटना घडत असतात. त्यामुळे काळजी घेण्याची गरज आहे.

# ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## शेअर मार्केटमध्ये परताव्याचे आमिष दाखवून लुटणारे आठ जण ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

शेअर मार्केटमध्ये चांगल्या परताव्याचे आमिष दाखवुन ऑनलाईन फसवणुक करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा सायबर सेल पनवेलने पर्दाफाश केला असून आतापर्यंत आठ जणांना ताब्यात घेतले आहे.

१८ मार्च २०२४ ते १७ एप्रिल २०२४ या कालावधीत फिर्यादी यांना अनोळखी आरोपींनी मोबाईल फोनवर संपर्क करून एफ.एम ट्रेडर्स कंपनीमधील एक्झीक्युटीव्ह, अकाउंट डिपार्टमेंट हेड असल्याचे भासवुन फिर्यादी यांना एफएम ट्रेडर्स कंपनीच्या पीएमएस इकविटी कॅपिटल ॲपमध्ये फिर्यादींच्या नावाचे डिमॅट खाते ओपन करून, फिर्यादींना ट्रेडिंगकरीता विविध स्कीम सांगुन, फिर्यादींचा विश्वास संपादीत केला. त्यांना मोठा नफा करून देण्याचे आमिष दाखविले व फिर्यादींना एकुण २१,७१,७२१ रूपये वेगवेगळया बॅक अकाउंटवर ऑनलाईन पद्धतीने भरण्यास सांगितले. फिर्यादींची गुंतवणुक केलेली रक्कम परत न करता फसवणुक केली, म्हणुन कामोठे पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

ऑनलाईन शेअर मार्केट फ्रॉड गुर्हयांमध्ये वाढ होत असल्याने या गुन्ह्याची उकल करून आरोपीतांना






जेरबंद करण्याच्या अनुषंगाने पोलीस उपायुक्त, परि. २ पनवेलचे विवेक पानसरे यांचे आदेशाने हा गुन्हा ईएमसी सायबर सेल, पनवेल यांचेकडे पुढील तपासाकरीता देण्यात आला. सायबर सेल, पनवेलच्या पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व पथक यांनी गुन्हयातील बॅक व्यवहार आणि क्लिष्ट तांत्रिक विश्लेषण केले असता या गुन्ह्यातील संशयित आरोपी हे बंगलोर, कर्नाटक राज्य व इंदोर, मध्यप्रदेश याठिकाणी असल्याचे निष्पन्न झाले.

एकाच वेळी कारवाई होणे आवश्यक असल्याने सायबर सेल, पनवेलच्या पो.नि. दिपाली पाटील यांनी बंगलोर, कर्नाटक राज्य व इंदोर मध्यप्रदेश याठिकाणी वेगवेगळी पथके पाठवुन सापळा रचुन एकुण आठ आरोपींना शिताफीने अटक केली. ज्या कॉल सेंटरमधुन सायबर क्राईम केला जात होता त्या इंदोर येथील तुकोगंजमधील अपोलो टॉवर्समध्ये ऑनलाईन शेअर मार्केटच्या फसवणुकीकरीता कॉल सेंटरवर छापा टाकण्यात आला.

कारवाईतील १४ संशयित व्यक्तींकडे सखोल तपास चालु आहे. तपासादरम्यान बनावट वेबसाईट बनविणारा शुभम कुमार व आशिष कुमार प्रसाद आणि कॉल सेंटर चालविणारे आरोपीत यांचेकडे सखोल तपास केला असता त्यांनी खालील एकुण २५ बनावट वेबसाईट बनविल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या कारवाईदरम्यान एकुण ६० मोबाईल, चार लॅपटॉप, २० सिमकार्डस, बॅक अकाउंट डाटा, मोबाईल ईमेल डाटा, चेकबुक्स, डेबिटकार्डस, फसवणुक केलेल्या अथवा करावयाच्या बाबींच्या नोंदी असलेल्या वह्या इ. मिळुन आल्या आहेत. हा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कॉल सेंटरमध्ये एकुण आठ मुली व पाच मुले काम करीत असुन त्यांचेकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिक तपास चालु आहे. टोळीने केलेल्या फसवणुकीचे पश्चिम मध्य क्राइम पोलीस ठाणे, दक्षिण मध्य क्राईम पोलीस ठाणे बंगलोर शहर (कर्नाटक राज्य), सायबराबाद (तेलंगणा राज्य), टी. नगर (तामीळनाडु राज्य), जयपुर (राजस्थान राज्य), नवी मुंबई, पुणे (महाराष्ट्र राज्य) येथील पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंद आहेत. टोळीतील आरोपीतांनी भारतात विविध राज्यातील लोकांना फसविले असल्याची शक्यता आहे. जप्त मुद्देमालाचा अधिक तपास करण्याचे काम चालु आहे.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान सायबर सेल, पनवेल यांनी फिर्यादी यांच्या फसवणुकीची रक्कम भरलेल्या सर्व बँकांची खाती गोठविण्याबाबत बँकांना तत्काळ पत्रव्यवहार करून एकुण ६,०७,८५६ रुपये इतकी रक्कम गोठविण्यात यश मिळविले आहे.

**टेलिग्राम, व्हॉटसअ‍ॅप, इन्स्टाग्राम, फेसबुक या समाज माध्यमांवरून ओळख करून जर कोणी शेअर मार्केट गुंतवणुक अथवा इतर ऑनलाईन कामाचे प्लॅन सांगुन वेगवेगळया अकाउंटमध्ये ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करण्यास सांगत असेल तर त्याबाबत सतर्क रहावे. ऑनलाईन फसवणुकीची तकार टोल फी क्र. १९३० किंवा cybercrime.gov.in येथे त्वरीत करावी.**

**-विवेक पानसरे, पोलीस उपायुक्त**

# 'त्या' आईस्क्रिमसंदर्भात कंपनीचे थर्ड पार्टीकडे 'बोट'

**मुंबई : प्रतिनिधी**

आईस्क्रिममध्ये चक्क मानवी बोटाचा तुकडा आढळला आहे. मालाडमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला आहे. मालाडमध्ये एका डॉक्टरांनी ऑनलाईन डिलेव्हरी ॲपमधून घरी आईस्क्रिम मागवले, मात्र आईस्क्रिमचा पॅक फोडल्यानंतर त्यांना त्यामध्ये चक्क दोन इंच लांबीचा मानवाच्या बोटाचा तुकडा आढळून आला होता. या घटनेने परिसरात आता एकच खळबळ उडाली आहे. त्यानंतर आता या आईस्क्रिमच्या कंपनीने स्पष्टीकरण दिले आहे.

आइस्क्रिममध्ये मानवी बोटाचा तुकडा आढळून आल्यानंतर ब्रेंडन फेराओ यांनी इन्स्टाग्रामवर यम्मो कंपनीला टॅग करत पोस्ट शेअर केली. इतकंच नव्हे तर त्यांनी मालाड पोलीस स्टेशनमध्ये तक्रार कंपनीविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आईस्क्रिम तयार करणाऱ्या कंपनीची चौकशी सुरू केली असून फॉरेन्सिक तपासणीसाठी बोटाचा तुकटा प्रयोगशाळेत पाठवला आहे. पोलिसांनी यम्मो कंपनीवर गुन्हा केली आहे. २७२, २७३ आणि ३३६ आयपीसी अंतर्गत गुन्हा रजिस्टर्ड केला आहे पुढील तपास चालू आहे.

या सर्व प्रकरणावर आता यम्मो कंपनीने स्पष्टीकरण दिले आहे. आम्ही ही घटना अतिशय गांभीर्याने घेत संबंधित युनिटचे थर्ड पार्टी उत्पादन थांबवलेले आहे. त्या थर्ड पार्टी कंपनीने केलेली संबंधित आणि इतर उत्पादनेही बाहेर काढण्यात आली आहेत. त्या कंपनीतील उत्पादने बाजारातूनही हटवण्याचे काम सुरू आहे. उत्पादनाची गुणवत्ता आणि सुरक्षितता हे आमचे



अंतिम उद्दिष्ट आहे. आमची कंपनी कायद्याचे पालन करणारी आहे आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आम्ही अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करू, असे कंपनीने म्हटले आहे. दरम्यान अन्न आणि औषध प्राधिकरणाने (एफडीए) या प्रकरणाची दखल घेतली आहे आणि चौकशी सुरू केली आहे.

दरम्यान, फेराओ यांनी मीडियाला दिलेल्या माहितीनुसार, मला आइस्क्रीममध्ये बोट सापडल्यानंतर मी लगेचच ते बर्फात ठेवून दिले. त्यानंतर आइस्क्रीमच्या रॅपरसह मलाड पोलीस ठाण्यात पोहचला. आईस्क्रिमच्या रॅपरवर मॅन्युफॅक्टर डेट ११ मे २०२४ आणि एक्सपायरी डेट १० मे २०२५ लिहली होती. तर, हे आइस्क्रीम गाझियाबादच्या लक्ष्मी आइस्क्रीम प्रायव्हेट लिमिटेडकडून बनवण्यात आले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिथे या आइस्क्रीमचे उत्पादन केले होते त्या फॅक्ट्रीमध्ये तपास करण्यात येत आहे. त्यानंतर आईस्क्रिममध्ये बोट कसे आले याचा उलगडा होणार आहे. पोलिसांनी गाझियाबादची फॅक्ट्री सील केली आहे. येथेल आइस्क्रीम पॅक करण्यात आले होते. तिथे गेल्यानंतरच पुढील तपास करण्यात येणार आहे.

# विकासनिधींमध्ये पेणला प्रथम प्राधान्य देणार -खासदार सुनील तटकरे

**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदार संघातुन मला विजयी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी परिश्रम घेतले असे आपले नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार यांचे आभार मानण्यासाठी नसून भेट घेण्यासाठी आलो असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी पेण येथे सत्कार समारंभावेळी केले.

रायगड जिल्हा मतदार संघाचे नवनिर्वाचित खासदार सुनील तटकरे यांच्या विजयात मोलाचे वाटा उचलणारे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार यांचे आभार व्यक्त करण्यासाठी तसेच खासदार सुनील तटकरे यांचा सत्कार कार्यक्रम गोपाळकृष्ण हॉल येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास आमदार रविशेठ पाटील, आमदार अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दयानंद भगत, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, मा. जि. प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, डी. बी. पाटील, भाजप जिल्हा चिटणीस मिलिंद पाटील आदींसह भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, व घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, पेण मतदारसंचातून आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशिल पाटील यांच्या मार्गदर्शनखाली महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेऊन या मतदारसंघातून



मताधिक्य मिळवून दिले यामुळे भविष्यात पेणच्या विकासनिधीसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे प्रथम आमदार रविशेठ पाटील यांचे नाव पुढे असेल, असे आश्वासन त्यांनी या वेळी दिले.

पेण खारेपाट मधील पाण्याचा प्रश्न, जलद रेल्वे थांबे तसेच पेण शहरातील पिण्याचे पाणी असे अनेक प्रश्न प्रलंबित असून यासाठी पुढे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातील विरार - अलिबाग कॉरीडॉर सारख्या प्रकल्प बाधित शेतकऱ्यांसाठी भरघोस निधी, त्यांचे पुनर्वसन याबाबत पाठपुरावा करणार असून या प्रकल्पाच्या माध्यमातून सुशीक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवून देण्याचे काम होणार आहे.

या निवडणुकीत विरोधकांकडून एनडीए सरकार संविधान बदलण्याच्या अफवा पसरविण्यात आल्यामुळे काहीसा फटका महाराष्ट्रात बसलाय असला तरी जनतेने पुन्हा नरेंद्र मोदी यांना देशाच्या पंतप्रधापदी विराजमान केले असून या पदावर रुजू होताच पंतप्रधान मोदीजींनी यंदाचे वर्षे हे संविधान महोत्सव म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकीत पेण विधानसभा मतदार संघात ७५ हजारांचे मताधिक्य देण्याकरिता महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागा असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, सुनील तटकरे यांना पेण तालुक्यातून जवळजवळ ४७ हजार मताधिक्क्य मिळवून दिले असून यामध्ये कार्यकर्त्यांची मेहनत व मतदारांचे योगदान असल्याचे सांगून गेली अनेक वर्ष निवडून येत असलेले उमेदवार अनंत गिते हे निवडून आल्यावर मतदार संघात ढुंकून पहिले नाही, परंतु आता हक्काचा खासदार तटकरेंच्या रूपाने निवडून दिला असून येत्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार निवडून येतील असा आत्मविश्वास आमदार रविशेठ पाटील यांनी व्यक्त केला.

या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले तसेच भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, मा. नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी आपल्या भाषणातून पेण तालुकयातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी भरघोस निधी उपलब्ध करावे, अशी मागणी करून लांब पल्ल्याच्या रेल्वे, तिकीट खिडकी याबाबत खासदार सुनील तटकरे यांनी पाठपुरावा करावा, अशी मागणी केली.

# फसवणूकप्रकरणी टुर्स कंपनीच्या व्यक्तीस अटक

**पनवेल :** चारधाम यात्रेला घेऊन जातो असे सांगून अनेक लोकांची फसवणूक करणाऱ्या मैत्रेय हॉलिडेज् या टुर्स कंपनीच्या व्यक्तीस शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दिनेश पाटील (रा.करंजाडे) असे या आरोपी इसमाचे नाव असून त्याने मैत्रेय हॉलिडेज कंपनीच्या माध्यमातून प्रमोदकुमार ठाकूर या ज्येष्ठ नागरिकांना व त्यांच्या नातेवाईकांना तसेच इतर अनेक व्यक्तींना चारधाम यात्रेकरिता घेऊन जातो असे सांगून यांच्याकडून ६८ हजार



रुपये घेऊन त्यांना चारधाम यात्रा न करवता किंवा कोणताही परत मोबदला न देता त्यांची आर्थिक फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन वायकर व त्यांच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आहे. याच्या अटकेमुळे जवळपास १७० ते १८० टुर्स मेंबर्सची आर्थिक फसवणूक केल्याचे उघडकीस होणार आहे.

पान १ वरून

## विधानसभा निवडणुकीत विजय मिळवू

नरेटिव्ह खोडून काढा. काल, परवा महाराष्ट्राला कमी निधी असा नरेटिव्ह आला. खरेतर आधी महाराष्ट्राला ५.१% टक्के निधी मिळायचा, आता ६.३% मिळतो. त्याच्या वाटपाचे निकष वित्त आयोग ठरवते. वक्फ बोर्डाला १० कोटी निधी असा नरेटिव्ह तयार करण्यात आला आहे. प्रत्यक्षात फक्त दोन कोटी देण्यात आला आहे. बीडीडी चाळीतील लॉटरी काढली नाही, असा नरेटिव्ह केला. ती २० मे रोजीच होती, पण मतदान असल्याने पुढे ढकलली गेली. ती होणारच आहे. स्मार्ट मीटर लावणार असा नरेटिव्ह, मात्र प्रत्यक्षात असा निर्णय नाही, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मेरिटमध्ये येणाऱ्यांना थोडे मार्क कमी मिळाले तर चेहरे पाडतात आणि जे नापास होतात ते दोन मार्क अधिक मिळाले म्हणून हत्तीवरून साखर वाटतात. मनात किंतु-परंतु ठेवू नका. आपल्यात क्षमता आहे. आताची मते कायम ठेवून एक टक्का मते वाढवली, तर विधानसभा आपण क्लीन स्वीप करू. आता कामाला लागा, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

दरम्यान, सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय मंत्रिमंडळाने काम सुरू केले आहे. याबद्दल पंतप्रधान मोदींच्या अभिनंदनाचा आणि विकसित भारताच्या संकल्पाबद्दल ठराव या वेळी मांडण्यात आला तसेच नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार करण्यात आला.

# चक्रीवादळात कोसळलेल्या विद्युत मनोऱ्यांची महापारेषणकडून उभारणी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातल्या काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात चक्रीवादळ झाले. या चक्रीवादळाचा तहारखा परळी व परिसरालाही बसला. त्या वादळामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या गिरवली विभागाअंतर्गत येणाऱ्या अतिउच्चदाब वाहिनीचे सहा मनोरे नंदागौळ आणि अंबलवाडीच्या अतिदुर्गम डोंगरांमध्ये कोसळले. या दुर्घटनेमुळे २०० केरही, गिरवली-परळी सर्किट-२ आणि २२० केव्ही परळी PGCIL(पॉवरचिड) सर्किट-२ या दोन महत्वाच्या विद्युत वाहिन्या बंद पडल्या. या विद्युत वाहिन्या बंद पडल्यामुळे बौड व लातूर या जिल्हयांना होणाऱ्या विद्युत पुरवठ्याची परिस्थिती अत्यंत नाजूक बनली. परिस्थितीचे गाभीर्य लक्षात घेऊन महापारेषण प्रशासनाकडून तातडीने उपाय योजनेसाठी पाऊले उचलण्यात आली.

महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता नासिर कादरी तसेच परळी मंडळाचे अधीक्षक अभियंता मिलिंद बनसोडे यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पुनर्रउभारणीच्या कामाची नियोजनबद्ध आखणी केली. या कामासाठी लातूर, पाळी व निरवली येथील अभियंते व कर्मचाऱ्यांची संघबांधणी करून मनोरे उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले. भौगोलिकदृष्ट्या अत्यत दुर्गम असलेल्या डोंगरावर मनोरे पुर्नउभारणीचे काम करणे अतिशय जिकरीचे व अवघड होते. प्रत्यक्ष घटनास्थळी पोहचण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे मनोरा उभारणीसाठी लागणारे साहित्य व यंत्रसामग्रीची वाहतूक करणे अत्यंत कठीण होते.

या सर्व अडचणीवर मात करीत एकसंघपणे महापारेषणचे अभियते व कर्मचारी मुख्य अभियंता नासिर कादरी व अधीक्षक अभियता मिलिंद बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली अहोरात्र काम करीत होते.

अत्यंत कडक उन्हात कुठल्याही प्रकारची सावली नसलेल्या निर्जळ ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक तांत्रिक अडचणीवर मात करीत महापारेषाणच्या परळी, लातूर, बीडचे अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रितपणे अहोरात्र मेहनत घेऊन कोसळलेल्या सहा विद्युत मनोऱ्यांचे पायाभरणी, मनौरा उभारणी आणि दोन किलोमीटर तार ओढणीचे काम विक्रमी वेळात पूर्ण केले.

या मनोरा पुनरेउभारणीच्या कार्यामुळे सदर वाहिनीद्वारे होणारा विद्युत पुरवठ पूर्ववत झाला महापारेषण कंपनीच्या तांत्रिक टीमचे आणि अभियत्यांचे कार्य कौतुकास्पद ठरले असून, त्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे.



# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून रुग्णास मदत

## आमदार मंदा म्हात्रे यांचा पाठपुरावा

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय अर्थसहाय्यता या कक्षाची उभारणी केल्याने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या शिफारस पत्राने वाशी येथील एम.जी.एम. हॉस्पिटलमधील रुग्ण अनिल कृष्णकांत कोकाटे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून रक्कम एक लाख रुपयांची आर्थिक मदत म्हणून लाभ मिळाला.

आमदार म्हात्रे म्हणाल्या की, मुख्यमंत्री अर्थसहाय्य निधीमधून असंख्य गोर गरीबांना निधीच्या माध्यमातून सुलभ शस्त्रक्रिया होत असून त्यांचे उपचार ही व्यवस्थितरित्या होत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत अवघ्या वर्षभरात शेकडो अधिक गोरगरीब-गरजू रुग्णांना एकूण ३० लाख ३२ हजार रुपयांची आर्थिक मदत आमदार मंदा म्हात्रे यांच्या पत्रांन्वये वितरित केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन माजी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या संवेदनशीलतेमुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अनेक-विविध आजारांचा समावेशदेखील करण्यात आला आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांचे प्राण वाचविण्यात यश मिळविले आहे. गोरगरीब गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून अर्थसहाय्य केले जाते. या निधीचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी केले आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांनी केलेले परिश्रम आणि रुग्णसेवेसाठी दाखवलेली तत्परता यामुळे नवी मुंबई क्षेत्रातील शेकडो गरजू गरीब रुग्णांना रक्कम ३० लाख ३२ हजार रुपये पाचशे रुपयांची आर्थिक मदत प्राप्त झाली. तसेच शासनामार्फत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यक निधी मधून गरीब गरजू नागरिकांना आर्थिक मदत उपलब्ध होत असल्याने त्यांना एक आधार प्राप्त होत आहे. त्यामुळे आमदार मंदा यांच्या प्रयत्नांमुळे गरीब गरजू रुग्णासाठी हा निधी कक्ष हा एक आशेचा किरण ठरला आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या शिफारस पत्राने अनिल कृष्णकांत कोकाटे यांना मेंदूच्या शस्त्रक्रियेकरिता मुख्यमंत्री वैद्यकीय अर्थसहाय्यता निधीमधुन एक लाख रुपये प्राप्त झाल्याने कोकाटे परिवाराने आमदार म्हात्रे यांचे आभार मानले.

## निवडक

### रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईलची चोरी

**पनवेल :** रेल्वे प्रवासादरम्यान मोबाईल चोरी झाल्याची घटना घडली आहे. बाळकृष्ण गवई हा तरुण पनवेल लोकलने प्रवास करीत असताना अज्ञात चोरट्याने त्याच्याकडील २८ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबतची तक्रार त्यांनी पनवेल रेल्वे ठाण्यामध्ये त्याने केली आहे.

### अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेलजवळील पळस्पे फाटा ब्रीजखाली घडली आहे. विष्णूपंत कुलकर्णी (वय ५७, रा. शिरढोण) हे त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल घेऊन घरी जात होते. या वेळी पळस्पे फाटा ब्रीजखाली अज्ञात वाहनाची त्यांच्या गाडीला धडक बसून त्यात ते गंभीररित्या जखमी झाले व त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात वाहनाचा शोध शहर पोलीस करीत आहेत.

# पनवेलच्या चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण हटवले

### अनधिकृत टपऱ्या, फेरीवाले, दुकानांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कामोठे, खारघर, नावडे उपविभाग, पनवेल, कळंबोली अशा चारही प्रभागांमध्ये अनधिकृत टपऱ्या, फूटपाथवरील अनधिकृत फेरीवाले, अतिक्रमण केलेल्या दुकानांवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पाच प्रभाग अधिकाऱ्यांनी अतिक्रमण पथकाच्या माध्यमातून कारवाई केली.

आयुक्त मंगेश चितळे यांनी नुकतेच चारही प्रभागातील अतिक्रमण केलेल्या दुकानांवर,



अनधिकृत फेरीवाले, टपऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पनवेल महापालिकेचे उपायुक्त मारूती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण कारवाई केली जात आहे. प्रभाग समिती 'क' कामोठे मधील सेक्टर ११ येथील प्रस्तावित प्रभाग कार्यालय येथे अतिक्रमण केलेल्या अनधिकृत टपऱ्या, फेरीवाले यांच्यावरती जेसीबीच्या सहाय्याने निष्कासन कारवाई करण्यात आली. याचबरोबर कामोठे येथील सेक्टर ७मधील मोकळ्या भूखंडावरील अनधिकृतपणे उभ्या केलेल्या झोपड्यावर कारवाई करण्यात आली. खांदेश्वर रेल्वेस्थानकाजवळील अनधिकृत हातगाडे, फेरीवाले, अतिक्रमण केलेल्या टपऱ्या यावर प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे यांनी कारवाई केली.

प्रभाग समिती 'अ' उपविभाग नावडे फेज १, फेज २ येथील अनधिकृत नर्सरी, फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्यात आली. याचबरोबर १२ जून रोजी प्रभात समिती 'अ' उपविभाग नावडे सेक्टर ३५ येथील अनधिकृत मटण व चिकन शॉप चे १३ ताडपत्री शेडवरती प्रभाग अधिकारी अमर पाटील यांनी तोडक कारवाई केली. याचबरोबर तळोजा मजकूर कमानीजवळील लहान मोठे चार अनधिकृत होर्डिंग तोडण्यात आल्या.

गेल्या मंगळवारी ११ जून रोजी खारघर प्रभाग समिती 'अ' उपविभाग नावडे, पापडीचापाडा येथील अनधिकृत आठवडी बाजार बंद करण्यात आला. खारघरमधील सेक्टर २०,२१, २ येथे अनधिकृत हातगाड्या, फेरीवाले यांच्यावर अतिक्रमण पथकाने कारवाई केली तसेच कोपरा पुल येथे उभारलेल्या अनधिकृत झोपड्यांवरती प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांनी निष्कांसन कारवाई केली.

पनवेल प्रभागात बसस्थानकाजवळील अनधिकृत टपरींवर प्रभाग अधिकारी रोशन माळी यांनी कारवाई केली. प्रभाग समिती ब अंतर्गत कळंबोली हद्दीतील फूटपाथवरील अनधिकृत फेरीवाले तसेच हायवेवरील अनधिकृत सर्व हेल्मेट स्टॉल्सवर प्रभाग अधिकारी अरविंद पाटील यांनी कारवाई करून त्यांचे सामान जप्त केले.

## पनवेलमधील मतदान केंद्रांची संख्या वाढविण्याची मागणी

**खारघर : प्रतिनिधी**



कोकण पदवीधर मतदार संघासाठी मतदान २६ जुन रोजी होणार आहे. या दृष्टीने राजकीय पक्ष निवडणुक आयोग कामाला लागले आहे. या मतदार संघातील रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त मतदार संख्या असल्याने पनवेलमध्ये मतदान केंद्र संख्या वाढविण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदवीधर सेलचे प्रदेश उपाध्यक्ष अनंत वारे यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

निवडणूक आयोग संकेत स्थळानुसार सहा जिल्ह्यातील मतदान पैकी डिसेंबर २०२३च्या मतदार यादी नुसार ठाणे जिल्हा अंदाजे ७४०००, रायगडमध्ये अंदाजे ४७००० मतदार नोंदण आहे. रायगड मधील पनवेल तालुक्यातील अंदाजे १६००० मतदार नोंदणी आहेम मागील निवडणुकीत पनवेलमध्ये अवघे एकच मतदान केंद्र असल्याने या केंद्रावर मोठी गर्दी होते. या अनुषंगाने पनवेल विभागात जास्तीत जास्त मतदान केंद्र उपलब्ध करावेत व कामोठे व खारघर या शहरात प्रत्येकी एक मतदान केंद्र उपलब्ध करावेत, अशी मागणी मुख्य निवडणूक आयोग व कोकण विभाग निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडे अनंत वारे यांनी केली आहे.

शहरी भागातील पदवीधर मतदार नौकरी व व्यवसाय निम्मित बाहेर पडत असतो त्या मतदारास शहरातच मतदान केंद्र उपलब्ध असेल तर मतदान करण्यास सोपे होईल, असेही वारे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

## पनवेल महापालिकेचा आपत्कालीन कक्ष सज्ज

**खारघर : प्रतिनिधी**

पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर पालिका क्षेत्रात आपत्कालीन कक्ष सुरु करण्यात आला आहे का? सध्य स्थितीत पालिकेच्या अग्निशमन ईमारती मधील अग्निशमन दलाच्या कक्षातच हे आपत्कालीन कक्ष कार्यरत राहणार आहे. २४ तास हे कक्ष कार्यरत राहणार असून अग्निशमन दलासह पालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यावर या कक्षाची दुरा असणार आहे.११० कर्मचारी याकरिता कार्यरत राहणार आहेत. याकरिता पालिकेने दूरध्वनी क्रमांकदेखील जाहीर केला असून पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थितीत या कक्षाशी संपर्क साधण्याचे अवाहन डॉ वैभव विधाते यांनी केले आहे. पनवेलमध्ये पालिकेमार्फत आपत्कालीन कक्ष अग्निशमन दलाच्या इमारतीमधून कार्यरत राहणार असुन पनवेल मधील ग्रामीण भागासाठी तहसील कार्यालयामार्फत हे कक्ष कार्यरत राहणार आहे. पालिकेच्या चारही प्रभागात वेगवेगळे पथक तयार करण्यात आले आहेत. याकरिता ११० जणांची टिम कार्यरत असणार आहे. आपत्कालीन परिस्थिती कोणता प्रसंग उद्भवल्यास वैद्यकीय सुरक्षा पुरविण्याच्या दृष्टीने उपजिल्हा रुग्णालयात १० खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात चिंचवाडी, धोदानी, सतीची वाडी, मालडुंगे या आदिवासी वाड्यासह या गावांना धोका आहे.



**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे शहर सरचिटणीस अक्षय सिंह यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अमर पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, विवेक होन, रोहित जगताप, देवांशू प्रभाळे आदी उपस्थित होते.**

## अडथळा निर्माण करणारे झाड हटवले

### भाजपच्या रावसाहेब खरात यांचा पाठपुरावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवनाथ मंदिरा बाजूला नवनाथ नगर वसाहत येथे पाऊस आणि वादळामुळे मोठ्या गटारात पडलेले आंब्याचे आणि पेरूचे झाड भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात यांच्या प्रयत्नाने हटविण्यात आले आहे.

नवनाथ मंदिरा बाजूला नवनाथ नगर वसाहत येथे पाऊस आणि वादळामुळे मोठ्या गटारात आंब्याचे आणि पेरूचे झाड पडल्यामुळे पावसाचे पाणी गटारात साचून बाहेर येवू लागले आणि पावसाच्या पाण्याने वाहुन आलेला कचरा साचू लागला. रावसाहेब खरात यांनी तातडीने पनवेल महापालिकेला कळवून झाड गटारातून हटवण्यास कळवले. ताबडतोब पनवेल महापालिकेने झाड हटविण्याची कारवाई केली. त्यामुळे पावसाच्या पाण्याने तुंबलेले गटार साफ झाले आणि पाण्याचा निचरा झाला.

स्थानिक नागरिकांनी रावसाहेब खरात यांचे आणि पनवेल महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानले.





**पनवेल : महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त मंगेश चितळे यांना माजी नगरसेविका नीता माळी, भाजपा ओबीसी मोर्चा सोशल मीडिया जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, चंद्रकांत मंजुळे, लायन्स ग्रुपचे अध्यक्ष जितेंद्र फडके, महिला मोर्चा प्रभाग अध्यक्षा संजीवनी खिल्लारे, स्वाती पवार, सुनीता गुरव, ज्योती शेटे, नंदा नंदाळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी शुभेच्छा दिल्या.**

## करंजाडे बसच्या फेऱ्या वाढविण्याची प्रवाशांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे वसाहतीमध्ये सिडको महामंडळाने येथे खासगी विकासकांना इमारती बांधून रहिवाशांना राहण्यासाठी भोगवटा प्रमाणपत्र दिले, मात्र पाणी, वाहतुकीसाठी बस अशा सोयीसुविधा अद्याप पुरेशा न सुरू झाल्याने नागरिक वैतागले आहेत. नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रम सेवेची ७६ क्रमांकाची बससेवा पनवेल रेल्वेस्थानक ते करंजाडे या मार्गिकेवर धावते, मात्र या बसच्या फेऱ्या कमी असल्याने प्रवाशांची रात्रीच्या वेळी प्रचंड गर्दी पनवेल रेल्वेस्थानकाबाहेर दिसते. त्यामुळे या बसची संख्या वाढविण्याची मागणी होत आहे.



बसच्या अपुऱ्या सोयीसोबत तीन आसनी रिक्षांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना ताटकळत बसची प्रतीक्षा करावी लागते. यामध्ये कामावरून घरी परतणाऱ्या महिलांचे प्रमाण मोठे आहे.

कळंबोली येथे राज्य परिवहन विभागाचे कार्यालय आहे. रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यांचे परिवहनबाबतचे प्रश्न या कार्यालयातील वरिष्ठांनी सोडविण्यासाठी पाठपुरावा करायचा आहे, परंतु परिवहन विभागाच्या या प्रादेशिक कार्यालयातून फक्त वाहनांची नोंदणी, वाहनांचे थकीत कर जमा करणे यालाच प्राधान्य दिले जाते. प्रादेशिक परिवहन विभागाचे भरारी पथक फक्त क्षमतेपेक्षा जास्त वजन वाहू अवजड वाहनांना पकडण्यासाठी तैनात असतात. कोणत्या मार्गिकेवर नवी मुंबई महापालिकेच्या किंवा राज्य परिवहन मंडळाच्या बसफेऱ्या वाढविण्यासाठी प्रवासी संघाचे प्रतिनिधी, एनएमएमटी, एसटीचे अधिकारी यांची बैठक लावून कोणताही मार्ग आजपर्यंत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून काढण्यात आलेला नाही. तीन आसनी रिक्षा या मार्गावर वाढविल्यास काही प्रमाणात रात्रीअपरात्री प्रवास करणाऱ्या नोकरदार प्रवासी महिलावर्गाला ताटकळत स्थानकाबाहेर रहावे लागते. त्यामुळे या बसची संख्या वाढविण्याची मागणी होत आहे.

## एमआयडीसीकडून सिद्धेश्वरी वळणावरील अतिक्रमण निष्कासित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा औद्योगिक परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरण व बाहेरील येणाऱ्या कामगारवर्गाची गरज लक्षात घेता सिध्देश्वरी कॉर्नर येथील फुटपाथ रोडलगत स्थानिक नागरिकांनी आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी छोटी-मोठी दुकाने थाटली होती. ही जागा एमआयडीसी हद्दीमध्ये येत असून या दुकांनाच्या मागील बाजूने गॅसची लाईन गेल्यामुळे सिध्देश्वरी कॉर्नर येथील अतिक्रमण एमआयडीसी प्रशासनाने नोटीस देऊन बुलडोजर लावून हटविले. याबाबत स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

गेली २० ते २५ वर्षापासून आम्ही या ठिकाणी छोटा-मोठा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत असून आम्ही पुढे काय करायचे हा प्रश्न स्थानिकांसमोर निर्माण झाला आहे. एमआयडीसी प्रशासनाने आमच्या जमिनी कवडीमोल भावाने घेवून आमच्यावर अन्याय केला असून आम्हाला कोणत्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध नसल्यामुळे आम्ही छोटा-मोठा व्यवसाय करीत आहोत. यावरही एमआयडीसीने आमच्या व्यावसायिकांच्या पोटावर पाय दिल्याने स्थानिकांत नाराजी दिसून येत आहे.



# नालेसफाईदरम्यान बंदिस्त नाल्याचा शोध

### ओएनजीसी सिग्नल परिसरातील पाण्याच्या प्रवाहाचा अडथळा दूर

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेने यावर्षी केलेल्या नालेसफाईबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दरवर्षी पहिल्या पावसात तुंबणाऱ्या जागांपैकी यावर्षी बहुतांशी ठिकाणी पावसाचे पाणी सुरळीत वाहत आहे. विशेष म्हणजे या नालेसफाईदरम्यान ओएनजीसी सिग्नल परिसरात पालिकेला नाल्यांची सफाई करताना नवीन नाला सापडल्याने दरवर्षी ओएनजीसी परिसरात मोठ्या प्रमाणात साचणारे पाणी यावर्षी साचणार नाही.



याठिकाणी तुंबणारे पाणी लक्षात घेता पालिकेने पाण्याचा योग्य निचरा करण्याच्या दृष्टीने उपाययोजना राबविण्यात आल्या. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी प्रत्यक्ष ठिकाणी भेट दिली. स्वच्छता निरीक्षक शैलेश गायकवाड, अभिजित भवर यांनी याठिकाणी उपाययोजना राबवत असताना याच परिसरात ओएनजीसी ते थेट काळुंद्रे नदीला जोडलेला नाला दिसला. ७०० ते ८०० मीटर लांबीचा तसेच दोन ते अडीच फुटाचा हा नाला आहे. हा नाला पूर्णपणे मातीने भरलेला होता. पालिकेने तत्काळ त्याची सफाई हाती घेतली असून दोन दिवसात या नाल्याची सफाई पूर्ण झाल्यावर ओएनजीसी याठिकाणी दरवर्षी साचणारे पाणी या नाल्याद्वारे थेट काळुंद्रे नदीत जाणार आहे. त्यामुळे याठिकाणी दरवर्षी साचणारे पाणी यावर्षी कमी प्रमाणात साचणार आहे.

एमएसआरडीसीच्या माध्यमातून या नाल्याजवळ पाईप लाईन टाकण्याचे काम केले गेले आहे. त्यावेळेला हा नाला मातीच्या ढिगाऱ्यात बंदिस्त झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

#### नालेसफाईचे काम पूर्ण

पालिका क्षेत्रात खारघर, कळंबोली, पनवेल, नवीन पनवेल आदी ठिकाणचे काम पूर्ण झाले असले तरी ज्या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य रित्या होत नाही. अशा ठिकाणी त्वरित मनुष्यबळाचा वापरून हि समस्या दूर केली जात असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.

## पनवेल शहर पोलिसांच्या तपासामुळे हरविलेली इकोस्पोर्ट गाडी सापडली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांच्या सतर्कतेसह तांत्रिक तपासामुळे अवघ्या काही तासातच हरविलेली इकोस्पोर्ट गाडी मालकाला पुन्हा मिळवून दिल्याने त्यांनी पनवेल शहर पोलिसांचे आभार मानले



मनोज राणे (रा. करंजाडे) हे त्यांची एमएच ०२-डीजे २४६९ नंबरची फोर्ड कंपनीची इकोस्पोर्ट गाडी ही पंचरत्न चौक येथून चोरी झाली म्हणून तक्रार देण्याकरिता पनवेल शहर पोलीस ठाण्यात आले होते. तक्रारीच्या अनुषंगाने वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रकाश पवार, पो.हवा.अमोल पाटील, मिथुन भोसले, विशाल दुधे आदींच्या पथकाने घटनास्थळाचे तसेच आजूबाजूचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहणी केली. सीसीटीव्ही फूटेज पाहणी करत करत पुढे गेले असता त्यापैकी एका सीसीटीव्ही फुटेज मध्ये तक्रारदार हे स्वतः ही गाडी घेऊन जाताना दिसले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांच्याकडे चौकशी केली असता. तक्रारदार यांनी सदरची गाडी ही काही काम निमित्त उरण नाका येथे घेऊन जाऊन पार्क केली व ते विसरून गेले असे निष्पन्न झाले.

यानुसार सदर ठिकाणी जाऊन गाडी ताब्यात घेण्यात आली व ती पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ती गाडी मुळ मालकांच्या ताब्यात देण्यात आली. पोलिसांनी अवघ्या काही तासात या गाडीचा शोध घेतल्याबद्दल राणे यांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

## संपादकीय

# लक्षणीय विजय व आव्हाने

ओदिशात एकहाती विजय मिळवत असतानाच भारतीय जनता पक्षाने आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांच्या मदतीने यश मिळवले. लोकसभा निवडणुकीतला भाजपचा विजय पूर्वीप्रमाणे दणदणीत झाला नाही याच आनंदात विरोधी आघाडी मश्गूल आहे, परंतु ओदिशा आणि आंध्र प्रदेशात भाजपने विक्रमी कामगिरी केली, त्याकडे मात्र विरोधकांनी सोयीस्कर दुर्लक्ष केलेले दिसते.

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीचा निकाल लागून देशात तिसरे मोदीपर्व सुरु झाले आहे. हे तिसरे आणि ऐतिहासिक पर्व सुरू होताना झालेली राजकीय धामधूम भारतीय मतदारांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे समर्थ सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली तडफेने कामाला लागले आहे. लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच ओदिशा आणि आंध्र प्रदेश या दोन्ही राज्यांत विधानसभेच्याही निवडणुका झाल्या. त्यात विरोधकांची धूळधाण उडाली ही वस्तूस्थिती लक्षात घ्यायलाच हवी. ओदिशात बिजू जनता दलाचे नवीन पटनाईक यांच्या नेतृत्वाखालील अडीच दशकांच्या राजवटीविरोधात भाजपने मिळवलेला विजय लक्षणीय आहे. या विजयामुळे भाजपचे पूर्व भारतातील स्थान पक्के झाले, तर आंध्र प्रदेशात वायएसआर कॉंग्रेसच्या जगनमोहन रेड्डी यांना मोठ्या पराभवाला तोंड द्यावे लागले. ओदिशात पहिल्यांदाच आदिवासी समाजातील, चारदा आमदार राहिलेले भारतीय जनता पक्षाचे मोहन चरण माझी तर आंध्रमध्ये तेलगू देसम पक्षाचे सर्वेसर्वा चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. या सरकारांना अनेक आव्हानात्मक बाबींवर मात करीत कारभार करावा लागेल. विशेषतः ओदिशात माझी यांचे सरकार आले असले तरी नवीनबाबूंच्या २५ वर्षांच्या कारकिर्दीने उमटवलेल्या ठशाचा विचार करूनच निर्णय घ्यावे लागतील. पटनाईक आता ७७ वर्षांचे असून त्यांची प्रकृती ढासळती आहे. बिजू जनता दलाविरोधात असलेले जनमत, कारभारातील ढिसाळपणा, भ्रष्टाचार या बाजू जमेच्या ठरल्या आहेत. विधानसभेच्या १४७ पैकी भाजपने ७८, तर बिजू जनता दलाने ५१ व कॉंग्रेसने चौदा जागा पटकावल्या. भाजपने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्री निवडीत आपले कसब दाखवले असून राज्यातील निरनिराळ्या घटकांना हुशारीने सरकारात प्रतिनिधित्व दिले आहे. हे कारभार आणि प्रशासनाला लोकाभिमुख बनवण्यासाठीचे रास्त पाऊल आहे. माझी व राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू दोघेही संथाल या आदिवासी समुदायातील आहेत. राज्यात त्यांची संख्या सुमारे वीस टक्के आहे. अर्थात, भाजपला हे यश एकाएकी मिळालेले नाही. पक्षाची तळागाळापर्यंतची बांधणी या यशाला कारणीभूत ठरली आहे. आंध्र प्रदेशात जगनमोहन रेड्डी यांनी कल्याणकारी योजनांचा सपाटा लावल्याने राज्याच्या तिजोरीवरील बोजा वाढला आहे. हे करताना रखडलेले औद्योगिकीकरण, त्याअभावी वाढलेली बेरोजगारी, नागरी सुविधांची हेळसांड व विकास प्रकल्पांचे रेंगाळणे या सगळ्याची किंमत रेड्डी यांना मोजावी लागली. सर्वांगीण विकासाकडे दुर्लक्ष केले, समतोल राखला नाही की सत्ताधाऱ्यांना त्याची किंमत मोजावी लागते, हे आंध्रमधील निकालातून दिसून आले. आता तिथे सत्तेवर येणाऱ्या तेलगू देसमच्या चंद्राबाबू नायडू यांची प्रतिमा देश पातळीवर किंगमेकर अशी असली तरी राज्याच्या तिजोरीवरील ताण व आश्वासनांची पूर्तता यांचा मेळ घालण्याची कसरत त्यांना करावी लागेल. राजधानी अमरावतीचे स्वप्न साकार करण्याबरोबरच कितीतरी प्रकल्पांच्या पूर्णत्वाच्या आश्वासनांना प्रत्यक्षात आणावे लागेल. अर्थात पंतप्रधान मोदींच्या भक्कम पाठबळामुळे या दोन्ही राज्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल झाला आहे हे निश्चित...**

# सुपारी बागायतदारांना हवी शासनाची साथ



**खबरबात**
संजय करडे

रायगड जिल्हा जसा पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा आहे त्याचप्रमाणे येथील नारळ, आंबा, पांढरा कांदा, ताज्या गावठी भाज्या व सुपारी यासाठीदेखील प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये इतर फळे व भाज्यांसह सुपारीचेही उत्पादन घेतले जाते. अलिबाग तालुक्यात सुपारी लागवडीचे क्षेत्र १७१.५, मुरूड तालुक्यात ३९९, श्रीवर्धन ९९.३ तर म्हसळा १३ हेक्टर मिळून एकूण ६८२ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असून सुपारीचे उतपादन वाढवण्यासाठी बागायतदार प्रयत्नशील आहेत.

कृषी विभागाकडून पुरेशी रोपे मिळाली तर येथील उतपादन क्षेत्रात वाढ होऊ शकते. कोकणातील नैसर्गिक वातावरण व मुबलक पाण्याच्या साठ्यामुळे येथील सुपारीला बाजारपेठेत मोठी मागणी आहे. सुपारीला धार्मिक आणि सांस्कृतिक कार्याबरोबरच व्यापारी आर्थिक आणि औषधी महत्त्व आहे. सुपारीचा मुख्यत्वे वापर हा खाण्यासाठी, सुगंधी सुपारी बनविण्यासाठी कच्चा माल म्हणून मागणी असते. सुपारीला मध्य प्रदेश, मेंगलोर, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार तसेच पाकिस्तान आणि बांगलादेश येथे मोठी मागणी आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत एकूण उत्पादित कृषी मालाच्या पाच टक्के उत्पन्न हे सुपारी उत्पादनातून मिळते.

श्रीवर्धन रोठा सुपारी या ब्रँडला जागतिक मान्यता आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापिठाने श्रीवधर्न रोठा या स्थानिक वाणातून 'श्रीवर्धनी' ही जात निवड पद्धतीने विकसित केली आहे. या सुपारीचा आकार मोठा असुन पांढऱ्या गराचे प्रमाण जास्त असते. सुपारीच्या झाडाला डिसेंबरमध्ये फळधारणा होत असून जून, जुलैपर्यंत सुपारी अर्धी कच्ची तयार होते. फळ काढणी ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारीमध्ये होते. सुपारी पिकाला पाण्याचा चांगल्याप्रकारे निचरा होणारी जमिन लागते. अशी जमिन रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीवर आहे. श्रीवर्धन येथील सुपारी संशोधन केंद्रातील रोपे विश्वासदायक व उत्कृष्ट दर्जाची असल्याने या रोपांना सर्वत्र मागणी आहे.

असे असले तरीदेखील सुपारीचे पीक शासनाच्या अनुदानापासून वंचित आहे. शासन दप्तरी फळपिकांमध्ये वर्गीकरण होत नसल्याने आंबा, काजू, भात याप्रमाणे सुपारीला भरपाईचे निकष देण्यात आलेले नाहीत. सुपारी पिकाचे नशाजन्य पदार्थांमध्ये वर्गीकरण होते. त्यामुळे शासन या पिकासाठी स्वतंत्र अनुदान देत नाही. सुपारी बागायत ही फायदेशीर असून नारळ व सुपारी हे पीक एकत्रित घेतले जाते. त्यामुळे फायदेशीर व नगदी पीक आहे. एका सुपारीच्या झाडापासून किमान एक हजार रु. वार्षिक उत्पन्न मिळू शकते.

जिल्ह्यातील १९३८मध्ये सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या मुरूड तालुका सुपारी खरेदी-विक्री संघाचे १४५० सुपारी उत्पादक सदस्य आहेत. या सुपारी खरेदी-विक्री संघाची वार्षिक उलाढाल सहा कोटींच्या घरात आहे. सुपारी पिकाचे उत्पादन वाढवण्यासाठी सुपारी बागायतदारांना मोफत रोपे पुरवून सुपारीचे उत्पादन वाढवणे आवश्यक आहे. यासाठी कृषी विभागाने सुपारी बागायतदारांना दिलासा देणारे काम करणे खूप आवश्यक आहे.

# आज जागतिक पवन दिन

आज जगभरात जागतिक पवन दिवस साजरा केला जात आहे. याला जागतिक पवन दिवस किंवा वर्ल्ड विंड डे असेही म्हणतात. हा दिवस जगभरात दरवर्षी १५ जून रोजी साजरा होतो. पवनऊर्जा आणि त्याचा उपयोग याबद्दल जागरूकता वाढवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. पवन ऊर्जेचे महत्त्व आणि ते जग कसे सुधारू शकते यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. हवेशिवाय जीवन कसे असेल याचा विचार करणेही अशक्य वाटते. हवा असेल तर जीवन आहे. आजही जगभरातील शास्त्रज्ञ इतर अनेक ग्रहांवर हवा शोधत आहेत. जागतिक पवन दिनानिमित्त ७५हून अधिक देशांमध्ये कार्यक्रम आयोजित केले जातात.

ग्लोबल विंड डेचे आयोजन युरोपियन विंड एनर्जी असोसिएशन आणि ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिल आणि राष्ट्रीय संघटनांद्वारे केले जाते. या दिवसाची स्थापना सामान्य लोकांना पवन ऊर्जा आणि त्याचे फायदे जाणून घेण्यासाठी करण्यात आली. हा दिवस पहिल्यांदा २००७मध्ये युरोपियन विंड एनर्जी असोसिएशन आणि ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिलने साजरा केला. त्यानंतर २००९मध्ये तो जागतिक स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. २००९पर्यंत जागतिक पवन दिवस किंवा



ग्लोबल विंड डे नव्हता. २००९पासून हा दिवस अधिक सर्वसमावेशक बनला आणि लोकांपर्यंत पोहचवला गेला आहे.

आपण अशा काळात जगत आहोत जिथे जगभरात ग्लोबल वार्मिंगचा धोका आहे. अशा परिस्थितीत पवन ऊर्जेसारख्या उर्जेचा कार्यक्षमतेने वापर करणे महत्त्वाचे ठरते. globalwindday.org नुसार, पवन ऊर्जा सध्या एक परिपक्व आणि मुख्य प्रवाहातील तंत्रज्ञान आहे. २०१५मध्ये १०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणुकीसह हे जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक क्षेत्रांपैकी एक आहे. एकट्या EUमध्ये, पवन उद्योगाने गेल्या वर्षभरात गॅस आणि कोळसा यांच्या तुलनेत जास्त क्षेत्र व्यापले आहे. हे क्षेत्राच्या १५ टक्के विजेच्या वापराची पूर्तता करण्यासाठी पुरेशा संचयी स्थापित क्षमतेसह केले जाते, जे ८७ दशलक्ष घरांना वीज पुरवण्याइतके आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व खूप मोठे आहे, अधिकाधिक लोकांना पवनऊर्जेची माहिती व्हावी.

भारतात वाढणारी लोकसंख्या पाहता भविष्यात मोठ्या प्रमाणात उर्जेची गरज भासणार आहे. देशानेही पवन उर्जेचे महत्व ओळखलं आहे. भारत पवन उर्जेच्या बाबती जगात चौथ्या क्रमांकावर आहे. ज्यात सर्वाधिक योगदान तमिळनाडू राज्याचे आहे. देशातील पवन उर्जेच्या माध्यमातून ४० गीगा व्हॅट उर्जेचे उत्पादन केले जाते.

हरितगृह वायू उत्सर्जन कमी करून वातावरणातील बदल कमी करण्यात पवन ऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावते. वाऱ्यापासून वीज निर्माण केल्याने जीवाश्म इंधनावर आधारित वीजनिर्मिती बदलण्यास मदत होते, जे जागतिक कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन आणि हवामान बदलामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देते.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे ट्रेनिंग घेऊ शकता मोफत

देशातील तरुणांचे कौशल्य वाढवण्याच्या उद्देशाने भारत सरकारने मोफत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमाला एआय फॉर इंडिया २.० (AI for India 2.0) असे नाव देण्यात आले आहे. गेल्या शनिवारी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या कार्यक्रमाची सुरुवात केली. हे प्रशिक्षण ऑनलाईन मिळणार आहे. हे प्रशिक्षण घेणाऱ्या तरुणांना एआयची प्राथमिक माहिती मिळू शकेल, तसेच या तरुणांना आपल्या करिअरमध्येही या प्रशिक्षणाचा फायदा होईल.



जागतिक युवा कौशल्य दिन म्हणजेच १५ जुलैला या कार्यक्रमाची सुरुवात रोजी झाली. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या देखरेखीखाली सुरू झालेला हा प्रोग्राम स्किल इंडिया, आयआयटी मद्रास, आयआयएम अहमदाबादची कंपनी जीयूव्हीआय यांचा संयुक्त उपक्रम आहे. देशाच्या भौगोलिक परिस्थितीमुळे आणि बहुभाषिक असल्याने सध्या ते इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम्, उडिया, मराठी आणि गुजराती या नऊ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. देशाच्या प्रत्येक भागात पोहोचण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. एआयची माहिती अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहचवावी लागणार आहे. प्रादेशिक भारतीय भाषांच्या माध्यमातून हे काम अगदी सहज करता येईल, असा केंद्र सरकारचा विश्वास आहे, तसेच तरुणांना सक्षम बनवता येईल. कार्यक्रम यशस्वी झाल्यास, तो इतर भाषांमध्येही उपलब्ध करून दिला जाईल.

या कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू झाली आहे. https://www.guvi.in/ai-for-india/tatsu-section-V6VE9tukoel या लिंकला भेट देऊन कोणताही तरुण स्वतःची नोंदणी करू शकतो. मागितलेली माहिती भरून नोंदणी पूर्ण करा. १५ ऑगस्ट २०२३ रोजी व्हर्च्युअल कार्यक्रमात सामील व्हा आणि दिलेल्या वेळेनुसार प्रकल्प सबमिट करा. १४ ऑगस्ट २०२३पर्यंत नोंदणी करता येईल. त्यानंतर नोंदणी बंद होईल. शिकण्यासाठी तुम्ही ऑनलाइन उपलब्ध असणे आवश्यक आहे. सर्व कंटेन्ट ऑनलाइन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. केंद्र सरकारही यशस्वी तरुणांना इंटर्नशिपची संधी देणार आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सरकारकडून एक प्रमाणपत्रही दिले जाईल, जे तरूण आपल्या करिअरच्या काळात कधीही, कुठेही वापरू शकतात.

# संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर



**निमित्त**

मराठी पत्रकार, लेखक आणि वक्ते अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील वाई येथे झाला. त्यांचे वडिल वामनराव कोल्हटकर हे एक वकील आणि नेमस्तपक्षीय सुधारक नेते होते. अच्युतरावांचे पालनपोषण त्यांचे चुलते बळवंतराव यांनी केल्यामुळे अच्युतराव त्यांचे नाव लावीत. बीए एलएलबीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर सातारा आणि नागपूर येथे अनुक्रमे शिक्षक व वकील म्हणून काम केले. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

१९०७मध्ये देशसेवक या पत्राचे संपादक होऊन जहाल राष्ट्रवादी राजकारणात अच्युत बळवंत कोल्हटर यांनी प्रवेश केला. त्याबरोबरच त्यांची अनेक चढ-उतारांनी भरलेली राजकीय आणि वृत्तपत्री कारकीर्द सुरू झाली. या कारकीर्दीत १९०८मध्ये लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा जहाल भाषेत पुरस्कार केल्याबद्दल आणि १९३०मध्ये गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना कारावास भोगावा लागला.

त्यांनी १९१५ साली काढलेल्या संदेश ह्या पत्राने मराठी वृत्तपत्रसृष्टीचा गंभीर चेहरामोहराच बदलून टाकला. भावनेला आवाहन करणारे, तसेच कल्पकतेने आणि विनोदाने प्रतिपक्षाची भंबेरी उडवून टाकणारे अग्रलेख, 'संदेशचा अहेर', 'बेटा गुलाबच्या कानगोष्टी', 'चहा, चिवडा, चिरूट', 'संदेश दरबारचा पदवीदान समारंभ' इ. चटकदार सदरे, चित्तवेधक बातम्या, आकर्षक मथळे यांमुळे मराठी वृत्तपत्रीय लेखनात बहुरंगीपणा आला व ते जनसामान्यांपर्यंत पोहोचले. त्यांनी चालू केलेल्या मेसेज (१९१७) ह्या इंग्रजी वृत्तपत्राचा मात्र जम बसला नाही. संदेश लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाच सरकारी अवकृपेस बळी पडला.

पुढे संजय, चाबूक, चाबूकस्वार ह्यांसारखी अनेक पत्रे त्यांनी काढली. पटवर्धन व तुळजापूरकर यांच्या साहाय्याने श्रुतिबोध (१९१२) आणि उषा (१९१३) ही मासिके चालविली. वत्सलावहिनी यांचे प्रसिद्ध व अप्रसिद्ध लेख (१९१५), चोरी कशी करावी? (१९२५), अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ (भाग १ ते ३, १९३३-३५) इ. पुस्तकांतून त्यांचे निवडक लिखाण संकलित झालेले आहे.

स्वामी विवेकानंद (आवृ. दुसरी, १९१६), नारिंगी निशाण (१९१७) व संगीत मस्तानी (१९२६) यांसारखी नाटकेही त्यांनी लिहिली. स्वतःची नाटक कंपनी काढून काही नाटकांतून भूमिका केल्या. काही कादंबऱ्या लिहिल्या, तथापि 'संदेशकार' हीच त्यांची जनमानसात विशेष रूढ झालेली प्रतिमा. होती. लोकमान्य टिळकांवरील मृत्युलेख, 'मराठी काव्याची प्रभात', 'शेवटची वेल सुकली', 'दोन तात्या', 'पुणेरी जोडे', 'माधवाश्रमात शिवाजी' ह्यांसारखे त्यांचे वेचक लेख वृत्तपत्रीय मराठी साहित्याची भूषणे होत.

वि.ह. कुलकर्णी यांनी 'अच्युत बळवंत कोल्हटकर चरित्र आणि वाङ्मय' या पुस्तकात कोल्हटकरांचा परिचय करून दिला आहे. अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ (भाग १ ते ३, १९३३-३५) (संपादक - अनंत हरि गद्रे : या ग्रंथांत अच्युत बळवंत कोल्हटकरांचे निवडक लिखाण आले आहे.) अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे नाव मुंबई-गिरगावातील एका रस्त्याला दिले आहे. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : अमेय नाझरे)



**श्रीवर्धन : बोर्ली पंचतन परिसरात सायंकाळी आभाळात दाटून आलेले ढग बेधुंद पावसाची चाहूल देतात.**

## आरोग्य प्रहर

# पौष्टिकतेने परिपूर्ण अशा मक्याच्या कणिसाचे फायदे

पावसाळा सुरू झाला आहे. या दिवसांत आपल्याला आजूबाजूला मक्याचे कणीस हातगाड्यांवर हमखास दिसते. मक्याचे कणीस खायला जेवढे चविष्ट आहे तेवढेच ते आरोग्यासाठीही फायदेशीर असते. मक्याच्या कणसात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन ई, मिनरल आणि अँटीऑक्सिडेंट्स पौष्टिक घटक असतात, जे आरोग्याच्या अनेक समस्या दूर करतात. यांसह कणसात फायबरसुद्धा असते. जे पचन सुधारण्यास आणि रक्तातील साखर कंट्रोलमध्ये ठेवण्यास उपयुक्त ठरते. याव्यतिरिक्तदेखील मक्याचे कणीस खाल्याने फायदे होतात, कोणते पाहुयात...



अनेक लोक घरातच मक्याचे कणीस भाजून खातात. काही लोक स्नॅक्स म्हणून कुरकरे खातात. त्यांच्यासाठी मक्याचे कणीस हा एक चांगला पर्याय होऊ शकतो, पण मक्याच्या कणासामध्ये हाय कॅलरी असतात.

मक्याचे कणीस, कॉर्न, मका याबाबत तुम्ही जर इंटरनेटवर सर्च केले तर अशा अनेक नव्या गोष्टी माहित होतील की, ज्यामुळे ते नुकसानकारक असल्याचे दिसते, पण जर हे मर्यादित प्रमाणात खाल्ले तर याचा मोठा फायदा होऊ शकतो.

**अशक्तपणाच्या तक्रारी दूर होतात** : अशक्तपणाची समस्या प्रामुख्याने महिलांमध्ये आणि लहान मुलांमध्ये दिसून येते. अशक्तपणाचे प्रमुख लक्षण म्हणजे थकवा जाणवणे. अशावेळी तुम्हाला कणीस खाणे फायद्याचे ठरते. यामुळे शरीरात लाल पेशी तयार होण्यास मदत मिळते, तसेच यातील पोषक घटकांमुळे रक्ताची कमतरतादेखील दूर होते.

**डोळे** : मक्याचे कणीस खाल्याने डोळ्यांचे आरोग्य राखण्यास मदत होते. यातील व्हिटॅमिन ए आणि बीटा कॅरोटीनसारखे पोषक घटकांमुळे दृष्टी सुधारण्यास फायदेशीर ठरतात. जर तुम्ही मक्याचे कणीस रोज खाल्ले तर याने डोळ्यांशी संबंधित आजार होण्याचा धोका कमी होतो.

**कोलेस्ट्रॉल कमी करण्यास उपयुक्त** : कणसात फायबर भरपूर प्रमाणात असते. ज्यामुळे शरीरातील बॅड कोलेस्ट्रॉलची लेव्हल कमी होण्यास मदत मिळते, तसेच तुम्ही रोज कणीस खाल्ले तर हृदयासंबंधित आजार दूर होण्याचा धोकाही कमी होतो.

**त्वचेसाठी फायदेशीर** : यात बीट कॅरोटिनचे प्रमाण जास्त असते. यामुळे डोळ्यांसह त्वचेचे आरोग्य राखतात. तसेच यातील अँटीऑक्सिडेंट्समुळे वृद्धत्वाच्या समस्येवर मात करण्यास मदत होते.

# सुधागडात जया भात बियाण्याची चणचण

## शेतकरी हवालदिल; कृषी विभागाने लक्ष देण्याची गरज

**पाली : प्रतिनिधी**

पावसाचे आगमन झाल्याने जिल्ह्यात सर्वत्र भातपेरणीची कामे सुरू झाली आहेत. यंदा जिल्ह्यात एक लाख एक हजार ५१० हेक्टरवर खरीपाची लागवड करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. प्रामुख्याने ९८ हजार ४८७ हेक्टरवर भाताची लागवड केली जाणार आहे, तर तीन हजार २३ हेक्टरवर नागली लागवडीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे, मात्र सुधागड तालुक्यात कृषी सेवा केंद्रावर जया भाताचे बियाणे उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे.



खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामाला लागला आहे. पावसाळ्यापूर्वीची मशागतीची कामे शेतकऱ्यांनी सुरू केली आहेत. दक्षिण रायगडात धूळपेरणीची कामे सुरू झाली आहेत.

याशिवाय बांधबंदिस्ती, चर मारणे यांसारखी कामेदेखील सुरू झाली आहेत, मात्र सुधागडमधील कृषी सेवाकेंद्रावर महाबीजचे जया भातबियाणे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही कृत्रिम टंचाई तर नाही ना? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. बियाणे संपल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

यंदाच्या खरीप हंगामासाठी सुमारे २५ हजार क्विंटल बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे. यात जवळपास २२ हजार क्विंटल सुधारीत तर २५० क्विंटल संकरीत भातबियाणांचा समावेश आहे.

कृषी निविष्ठांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आली आहेत, मात्र बियाणे उपलब्ध नसेल तर शेतकऱ्यांनी करायचे काय? असा सवाल निर्माण झाला आहे. कृषी अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची शेतकऱ्यांनी मागणी केली आहे.

काही दिवसांपूर्वी पेण तालुक्यात जया भातबियाणे उपलब्ध नसल्याच्या तक्रारी जिल्हा कृषी कार्यालयाकडे आल्या होत्या, मात्र लागलीच कृषी विभागाने याची दाखल घेऊन सर्व कृषी केंद्रांवर बियाणे उपलब्ध करून दिले आहे, अशी माहिती जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे, जिल्हा कृषी अधिकारी-अधीक्षक यांनी सांगितले.

**सुधागडातील साधारण ८० ते ९० टक्के शेतकरी जया पेरतात, मात्र यावर्षी शेतकऱ्यांच्या मागणीपेक्षा कमी बियाणे उपलब्ध झाल्याचे कृषी सेवाकेंद्रामार्फत सांगितले जाते. याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.**
**-निलेश शिर्के, शेतकरी, सुधागड**

**सर्व कृषी सेवा केंद्रावर जया व इतर बियाणे उपलब्ध आहेत. सुधागडात हे बियाणे उपलब्ध नसल्याचे माझ्यापर्यंत अजून आलेले नाही. याबद्दल चौकशी करते. तसे असेल तर लागलीच हे बियाणे उपलब्ध करून देण्यात येईल.**
**-वंदना शिंदे, जिल्हा कृषी अधिकारी, रायगड**

# मेडिकल कॉलेजमध्ये मुलीला प्रवेश देतो सांगून फसवणूक

## डॉक्टरला १८ लाखांचा गंडा; दोघे अटकेत

**महाड : रामप्रहर वृत्त**

कर्जतमधील सुप्रसिद्ध मेडिकल कॉलेज डॉ. एन. वाय. तासगावकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देतो असे सांगून महाड शहरातील एका डॉक्टरकडून १८ लाख ८० हजार रुपये घेऊन फसवणूक करणाऱ्या दोघा जणांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

महाड शहरातील डॉ. आदेश कुमार पाथरे यांची मुलगी स्वामिनी पाथरे हिला डॉ. एन. वाय. तासगावकर कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन देतो असे सांगून नितीन जयवंत पवार (वय ३४) व निकिता नितीन पवार (वय ३०, दोघेही रा. आवळस, कर्जत) या दांपत्याने डॉ. पाथरे यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन तसेच कॅश स्वरूपात १८ लाख ८० हजार रुपये घेतले. त्यातील चार लाख रुपये डॉ.पाथरे यांना परत दिले, मात्र त्यांनी फसवणूक केल्याप्रकरणी व त्यांच्या पत्नीला मानसिक त्रास देऊन शिवीगाळ करून धमकी दिल्याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात नितीन पवार व निकिता पवार या दांपत्यविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# पावसाळ्याच्या तोंडावरच महावितरणचा कारभार विस्कळीत

## सततच्या खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये संताप

**महाड : प्रतिनिधी**

महाडमध्ये मान्सूनने वेळेत दमदार हजेरी लावली आहे, मात्र या पहिल्याच पावसात महावितरणचा कारभार विस्कळीत झाला असून सततच्या खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. धो धो पाऊस सुरू झाल्यास काय स्थिती निर्माण होईल, असा प्रश्नदेखील स्थानिक नागरिक करीत आहेत.

महाडमध्ये गेले दोन-चार दिवसांपासून पाऊस कमी-अधिक प्रमाणात पडत आहे. काही ठिकाणी जोराचा वाराही सुटत आहे. या पहिल्याच पावसात महावितरण विभागाचा कारभार विस्कळीत झाला आहे. गेले काही दिवस सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. मान्सूनपूर्व कामांसाठी महावितरण विभागाने गेली काही दिवस सातत्याने वीजपुरवठा खंडित ठेवला होता, मात्र तरीदेखील पावसाळा सुरू झाल्यानंतर या ना त्या कारणाने वीजपुरवठा खंडित होत आहे.



महाड परिसरामध्ये अनेक गावांतून आजही सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. यामुळे लघु व्यावसायिकांवरदेखील परिणाम होत आहे. आठवड्यातून दोन ते तीन वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने दुग्धजन्य पदार्थ, आईस्क्रीम आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे इतर व्यावसायिकदेखील हवालदिल झाले आहेत.

विजबिल भरले नाही तर वीजपुरवठा खंडित करण्याची सूचना करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून पावसाळ्यापूर्वी केल्या जाणाऱ्या कामांची दखल मात्र वेळेत घेतली जात नाही. जागोजागी वृक्षांच्या फांद्या वीजतारांवरून आजही लटकत आहे. शिवाय जागोजागी ट्रान्स्फॉर्मर उघडे पडले आहेत. यामुळे नागरिकांच्या जीविताला धोकादेखील निर्माण झालेला आहे.

पावसाळ्यापूर्वी केली जाणारी कामे पावसाच्या तोंडावर केली जात असल्याने ऐन पावसाळ्यात सातत्याने वीजपुरवठा खंडित केला जात आहे. यामुळे नागरिक देखील प्रचंड संतप्त झाले आहेत. अशी कामे एक महिनाभराआधीच करणे आवश्यक आहे. पावसाळ्यापूर्वी केली जाणारी कामे ही सकाळीच करणे आवश्यक होते, मात्र भर दुपारी वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने उष्णतेच्या काळात नागरिक हैराण झाले होते.

महावितरणकडून सध्या स्थिती अनेक कामांचे ठेके दिले जात आहेत. या ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाची साधने वापरली जात असल्याचे तक्रार नागरिक करीत आहेत.

# चौलमध्ये भाजपकडून नालेसफाई, खोलीकरण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल नाका परिसरात मुख्य रस्त्यावर पाण्याचा निचरा योग्य होत नसल्याने भाजपच्या वतीने नालेसफाई व गटार खोलीकरणाचे काम हाती घेतले आहे.

ऐन पावसाळ्यात पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने चौल नाका व परिसरात पावसाचे पाणी तुडूंब भरते. ही समस्या गेली अनेक वर्षे चौलमध्ये सतावते. चौल ग्रामपंचायतीत प्रशासकीय कारभार असल्याने भाजपचे संकेत जोशी यांनी जातीने उपस्थित राहून हे काम हाती घेतले आहे.

चौल चौकी ते रेवदंडा बायपास, चौल नाका ते भाटगल्ली, बँक ऑफ महाराष्ट्र ते बेलोस्कर यांचे हॉटेलपर्यंत नालेसफाई व गटाराचे खोलीकरण करण्यात येत आहे.



# कृषी संजीवनी मोहिमेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे -कैलास वानखेडे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्ताने कृषी संजीवनी पंधरवडा १७ जून ते १ जुलै या कालावधीत उपविभागातील अलिबाग, पेण व मुरूड तालुक्यामध्ये राबविण्यात येणार आहे. या कृषी संजीवनी मोहिमेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांनी केले आहे.

हा कालावधी खरीप पिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने मोहिमेद्वारे कृषी विभागाचे अधिकारी, शास्त्रज्ञ, कृषीतज्ज्ञ, प्रगतशील शेतकरी हे शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरीता गावात जाऊन मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये बीजप्रक्रिया जनजागृती दिन, पीएम. किसान उत्सव दिवस, जिमिन सुपिकता जागृती दिन, गुणवत्तापूर्ण निविष्ठांची ओळख दिन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड व तंत्रज्ञान प्रसार, पिक विमा जनजागृती दिन, हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान प्रसार दिन, नावीन्यपूर्ण उपक्रम, सेंद्रीय शेती, नैसर्गिक शेती तंत्रज्ञान, भात व नागली लागवड तंत्रज्ञान दिन, तूर व इतर कडधान्य लागवड तंत्रज्ञान दिन, कृषी महिला शेतकरी सन्मान दिन, जिल्ह्यातील महत्त्वाच्या पिकांची कीड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना, शेतकरी मासिक वाचन दिन व वर्गणीदार वाढविणे, प्रगतशील शेतकरी संवाद दिन, कृषी दिन (कृषी संजिवनी सप्ताह सांगता व कृषी दिन) अशा प्रकारे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

लोक प्रतिनिधी, कृषी विद्यापिठातील तज्ज्ञ, प्रगतशील शेतकरी, कृषी विषयातील तज्ज्ञ नागरिक, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, महिलांचे गट, कृषी संलग्न विषयासी निगडीत तज्ज्ञ व्यक्ती व या मोहीमेत सहभागी होऊ इच्छिणारे स्वयंस्फूर्त युवक/युवती यांनी मोहीमेत सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी आपले कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खालापूर नगरपंचायत सफाई कामगार संपावर

## ठेकेदारामुळे तीन महिने पगार रखडला ▮ जागोजागी कचऱ्याचे ढीग



**खोपोली : प्रतिनिधी**

पगार वेळेवर होत नसल्याने खालापूर नगरपंचायतीचे २४ सफाई कामगार संपावर गेले असून शहरातील कचरा संकलन पूर्णपणे ठप्प झाले आहे. यामुळे जागोजागी कचरा पसरल्याने रोगराईची भीती व्यक्त होत आहे.

खालापूर नगरपंचायतीच्या सफाई कामगारांना तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. ऑक्टोबर २०२३मध्ये ठेकेदार बदल्याने त्या महिन्यातील पगारदेखील अद्याप सफाई कामगारांना मिळालेला नाही. स्वच्छ खालापूर सुंदर खालापूर ठेवण्यात महत्त्वाचा वाटा असलेल्या या स्वच्छतादूतांना मात्र वेळेवर पगार मिळत नसल्यामुळे सर्व जण हतबल झाले आहेत. मुलांच्या सुरू झालेल्या शाळा, दर महिन्याचा किराणा तसेच कर्जाचे हप्ते यामुळे आर्थिक कोंडीत सापडलेल्या सफाई कामगारांची ओढाताण सुरू आहे.

तीन दिवसांपासून नगरपंचायत हद्दीत घंटागाडी न फिरल्याने अनेक ठिकाणी कचरा उघड्यावर पडून आहे. कचराकुंड्या तीन दिवसाचा कचऱ्याचा भार सहन न झाल्याने आडव्या झाल्या आहेत. पावसामुळे कचरा कुजून दुर्गंधी पसरली असून रोगराईची शक्यता बळावली आहे. तीन महिन्यांचा पगार मिळाल्याशिवाय सफाई कामगार कामावर रूजू होण्यास नकार दिल्याने खालापूरकर नागरिकांचे आरोग्य टांगणीला लागले आहे.

# कर्जतच्या उल्हास नदीत पाणीसाठी वाढला

## कोल्हापूर टाईप बंधारा ठरला उपयुक्त

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या प्रति पंढरपूर येथील उल्हास नदीचा काठ पाण्याने भरला आहे. उल्हास नदीमध्ये मुद्रे येथील स्मशानभूमीच्या बाजूला कोल्हापूर टाईपचा सिमेंट बंधारा बांधून पूर्ण झाला असून त्या बंधऱ्यामुळे नदी जलमय झाली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून आणि त्यांच्या संकल्पनेतून सिमेंट बंधारा बांधण्यात आला आहे.

जानेवारी २०२४मध्ये शहरात उल्हास नदीच्या तीरावर प्रति पंढरपूर साकारण्यात आले आहे. नदीच्या तीरावर ५२



फुटांची श्री विठ्ठलाची भव्य उंचीची मूर्ती उभरल्यामुळे त्या परिसराला आळंदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे, मात्र उल्हास नदी उन्हाळ्यात कोरडी होत असल्याने तेथील परिसर जलमय असायला हवा, अशी सूचना वारकऱ्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांना केली. त्यानंतर आमदार थोरवे यांनी प्रति पंढरपूरची संकल्पना पुढे नेत नदीमध्ये कोल्हापूर टाईपचा सिमेंट बंधारा बांधण्यासाठी सुमारे एक कोटींचा निधी मंजूर करून आणला.

या बंधाऱ्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर कोल्हापूर टाईपचा बंधारा बांधून पूर्ण झाला आहे. आता पावसाळा सुरू झाला आहे. या बंधाऱ्यामुळे याभागात सुमारे २०० मीटर पाणीसाठा दिसून येत आहे. आमदार थोरवे यांची संकल्पना कर्जत श्री प्रति पंढरपूर येथे दिसून येणार आहे. चांगला पाणीसाठा राहिला तर या परिसरात बोटिंग सुरू करण्याचा मानस आमदार थोरवे यांचा आहे. बोटिंग सुरू झाल्यास या परिसराला आणखी महत्त्व प्राप्त होईल, तसेच स्थानिकांनाही रोजगार प्राप्त होणार आहे.

# श्री विश्वकर्मा मय पांचाळ मंडळातर्फे वह्यावाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

शिळगाव येथील श्री विश्वकर्मा मय पांचाळ मंडळातर्फे समाजातील इयत्ता पहिली ते दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्यावाटप कार्यक्रम नुकताच झाला.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष दीपक हातकमकर, उपाध्यक्ष अनंत झाडेकर, खजिनदार रमण धामणस्कर, कार्याध्यक्ष सनी भेलसेकर, महिला विश्वकर्मा बचत गट अध्यक्षा तसेच तालुका शहर संघटिका शिवसेना महिला आघाडी खोपोली आसावरी घोसाळकर आदी उपस्थित होते.



Adv. Asha Arunkumar Bhagat
Mobile No.8108355000

**Public Notice**

**IN THE COURT OF HON'BLE C.J.J D., AT PANVEL**

CIVIL MISC. APP.NO. .562/2024
Exhibit No
नि.७/ड
ने.ता. २२/७/२०२४

1) Smt. Nirmal Kaur
Residing at sarwan Singh House
Number 298/4, Parbhat Chowk,
Near Park Kilap Nagar Park,
Hoshiarpur, Punbab 146001
2) Smt Sangeeta Kaur .............. **Applicant**
Residing at KL-5 7/5 Sector 2
Kalamboli, Taluka Panvel
District Raigad 410218
3) Smt Satvinder Kaur
Residing at Sardara Chawl No.1
Mahakali Road Near Paper Box
Malpa Dongari No.3 Chakala
MIDC Andheri (E) Mumbai 40093

**Versus ........................ Nil** Opponent

It is hereby informed to the public at large that Surjit Kaur (Deceased) who died on 22/08/2015 at Panvel and Late Surjit Singh who died on 19/08/1992 at panvel who are the Parents of applicants. That Late Surjeet Kaur and applicant No.2 were the owners of the following property

1. That, the deceased Surjit Kaur and applicant no.2 were the owner and seized and possessed of and/or otherwise well and sufficiently entitled to the Apartment bearing Flat KL-5 Building No.7/5 Sector No.2 Kolamboli. Taluka Panvel District Raigad 410209 (hereingafter referred to as the said property)

2. The Family Tree of deceased Surjit Kaur is as below :-

Late Smt Surjit Kaur (Deceased)
Late Shri Surjit Singh (Deceased Husband)
Smt Nirmal Kaur (Daughter of Deceased)
Smt Sangeeta Kaur (Daughter of Deceased)
Smt Satvinder Kaur (Daughter of Deceased)

3. The Surjit Kaur and applicant no. 2 had purchased the aforesaid property from CIDCO vide the Agreement for sale of flat between Chaudhary & Co Thru Properitor Shri Dinesh Chaudhary and deceseased and applicant no. 2 for the total consideration of Rs.70,000/- (Rupees Seventy Thousand Only)

4. Schedule of the property of Surjit Kaur and applicant No. 2 is as below :-

**Schedule of the Property**

Apartment KL-5 7/5 Sector No. 2, Kalamboli Taluka Panvel, District Raigad 410209, Valuation of the property Rs.70,000/- (Rupees Seventy Thousand Only) is bounded as below :-
KL-5 7/5 Sector 2 Kalamboli
Taluka Panvel District Raigad 410218

On or Towards the East : Open Space
On or Towards the West : Apt No.No 8.
On or Towards the South : Apt No.No 8.
On or Towards the North : Open Space

5. That, the applicants states that after the death of deceseased they approached to the CIDCO office along with the death certificate of the deceseased but officers of the CIDCO stated that if the owner of the flat is death then applicants have to submit the heirship certificate from the Hon'ble Court, Therefore the applicants has to approach this Hon'ble Court to declare themselves as Legal Heirs of deceased Surjit Kaur who died on 22/08/2015.

That, consequent on the death of deceased applicant being the sole legal heirs and/or the legal representative of the deceseased as per the Hindu Sucessation Act 1956 as filed application u/s 2 of the Bombay Regulation Act No. VIII of 1927 for being declared as the legal heirs of the deceseased in respect of the above said property.
Anbody having any claim, objection against, in to or upon the above said property or the applicants being declared as the legal heirs of the deceased in respect of the above said property shall notify the same in writing within 30 days from the date hereof along with the supporting documentary evidence to the Hon'ble Court. Failing which, the heirship certificate will be issued in accordance with law

Date : 13/06/2024
Place: Panvel
Court Seal
Sd/-
By order
Superintendent
Civil Judge (JD) Panvel

# फ्लेमिंगोंसाठी ड्रोन धोक्याची तपासणी करा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गृह विभागाला निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील पाणथळ प्रदेशात विसावलेल्या फ्लेमिंगोचे छायाचित्रण करण्यासाठी ड्रोनचा वापर वाढत असल्याच्या चिंतेला उत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या गृह विभागाला या समस्येकडे लक्ष देण्यास सांगितले आहे. नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, नागरिकांमध्ये पक्ष्यांवर धोकादायकपणे ड्रोन नेव्हिगेट करण्याची वाढती क्रेझ (वेड) पाहिली आहे.



विस्मयकारक सुंदर चित्रे आणि रील्स सोशल मीडियावर फिरत आहेत, परंतु वन्यजीव छायाचित्रकारांनी हे लक्षात घेतले पाहिजे की ड्रोन पक्ष्यांसाठी धोकादायक आहेत, असे नॅटकनेक्टने म्हटले आहे.

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत समाविष्ट असलेले फ्लेमिंगो हे अतिशय संवेदनशील पक्षी आहेत आणि त्यांना ड्रोनवरील ब्लेडने दुखापत होऊ शकते किंवा मारले जाऊ शकते, असे कुमार यांनी नमूद केले.

मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने ई-मेल द्वारे सुजाता सौनिक, अतिरिक्त मुख्य सचिव-गृह यांना या समस्येकडे लक्ष देण्यास आणि कारवाई करण्यास सांगितले असल्याचे नॅटकनेक्टने सांगितले आणि खुलासा केला की त्यांनी पोलिसांना आधीच सतर्क केले आहे.

कुमार म्हणाले की, त्याहूनही चिंताजनक गोष्ट म्हणजे ड्रोन पक्षी उडत असतानाही त्यांचा जवळून पाठपुरावा करतात. ड्रोनमधून येणारा आवाजही घाबरून उडणाऱ्या पक्ष्यांना त्रास देऊ शकतो आणि हे पक्ष्यांसाठी धोकादायक आहे, असे पक्षी निरीक्षक ज्योती नाडकर्णी यांनी सांगितले.

ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यात भरतीच्या पाण्याची पातळी वाढल्यावर टीएस चाणक्य, एनआरआय आणि डीपीएस फ्लेमिंगो झोनमध्ये उतरणाऱ्या पक्ष्यांना ड्रोन त्रास देतात. अशाप्रकारे, नवी मुंबईचे मोठे जलस्त्रोत ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यच्या उपग्रह ओल्या जमिनी म्हणून काम करतात.

आणखी एका धोक्याकडे लक्ष वेधून घ्या, सागर शक्तीचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी अनेकदा सांगितले की, निहित स्वार्थाच्या इशाऱ्यावर काम करणारे काही बदमाश पक्ष्यांचा पाठलाग करण्यासाठी त्यांच्यावर दगडफेक करतात.

एकदा पक्षी येथे उतरणे बंद केले की या पाणथळ जागेवर डोळा ठेवून असलेले विकासक ही पाणथळ जागाफ्लेमिंगोचे निवासस्थान नाही आणि म्हणून ही क्षेत्रे विकासासाठी खुली करा असा दावा करण्याची शक्यता असल्याचे पर्यावरणवादी कार्यकर्ते पवार यांनी सांगितले.

कुमार यांनी खेद व्यक्त केला की सिडको पर्यावरणीय आणि पर्यावरणीय समतोल या सर्व मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून पाणथळ जमीन विकसित करण्यायोग्य जमीन पार्सल मानते. हा मुद्दा मनुष्य विरुद्ध वन्यजीव संघर्षाच्या पलीकडे गेला आहे, आणि सर्व तत्त्वांच्या विरुद्ध, कोणत्याही प्रकारे पैसे कमविण्याच्या मानवी लालसेबद्दल आहे, अशी खंत कुमार यांनी व्यक्त केले.

# तेव्हा ऊर्जामंत्र्यांना प्रश्न का नाही विचारला?

## भाजपच्या घंगाळेंचा काँग्रेसच्या म्हात्रेंना सवाल

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबईतील वीज प्रश्नावर मंगळवारी नवी मुंबई जिल्हा काँग्रेसने वाशी विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना भेटून आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. या वेळी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष अनिकेत म्हात्रे यांनी नवी मुंबईतील वीज प्रश्नावर शहरातील दोन आमदार झोपले असल्याची टीका केली होती. अनिकेत म्हात्रे यांच्या या आरोपाला आता भाजपचे युवा मोर्चा माजी जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे यांनी सडेतोड उत्तर दिले आहे.

नवी मुंबईतील वीज प्रश्न सोडवण्यासाठी मंदा म्हात्रे यांनी केलेल्या कामांची यादी वाचून अनिकेत म्हात्रे हेच झोपलेले असून आंदोलन करताना त्यांनी स्टंटबाजी करू नये, असे सांगून दत्ता घंगाळे म्हणाले की, त्यांच्याच पक्षाचे नेते ऊर्जामंत्री होते. त्या वेळी हा प्रश्न त्यांनी तत्कालीन ऊर्जामंत्री नितीन राऊत यांना का नाही विचारला?

आमदार मंदा म्हात्रे यांनी शहरांतील अनेक प्रश्न सोडविले आहेत. अनेक योजना राबविल्या आहेत, मात्र त्या आपण सांगत नसून फक्त वीज प्रश्न सोडविलेल्या कामांची यादी घंगाळे यांनी वाचून दाखवली. २५ कोटी खर्चून शहरात ६२२ ठिकाणी सोलर दिवे बसविलेले आहेत. हे सोलार वीज दिवे म्हात्रे यांना दिसले नाहीत का, सीसीटीव्ही दिसले नाहीत का? असा प्रश्न घंगाळे यांनी विचारला आहे. अनिकेत म्हात्रे यांच्या आईवडिलांनी दोघांनीही नवी मुंबईचे उपमहापौरपद उपभोगले आहे. आघाडी सरकारच्या काळात काँग्रेसचेच नितीन राऊत ऊर्जामंत्री होते. तेव्हा त्यांनी विजेच्या समस्यांबाबत राऊत यांना जाब का विचारला नाही ? असा प्रश्नही घंगाळे यांनी विचारला. प्रसारित करून म्हात्रेंना विचारला आहे.

# मनसेतर्फे दहावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

राज ठाकरे यांच्या ५६व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना व व्यापारी सेना यांच्या संयुक्त विद्यमाने वाशीमधील नवी मुंबई महापालिका माध्यमिक विद्यालय शाळा क्र.११० म्हणजेच शंकरराव विश्वासराव विद्यालय येथील १० वी उतीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला.

सर्व विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांसह राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमिता केक कापण्यात आला. या वेळी विक्रांत मालुसरे सहसचिव महाराष्ट्र राज्य व्यापारी सेनेचे सहसचिव विक्रांत मालुसरे, विशाल भणगे, नवी मुंबई मनविसेचे सहसचिव विशाल भणगे, शुभम भोईर, अभिजित आगरे, अनिरुद्ध मेंगडे, जयपाल पवार, शेखर अण्णा राव व इतर महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

या वेळी एक विद्यार्थी एक झाड लागवड संकल्पना राबवत वाशीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले तसेच पुढील तीन वर्षे या झाडांची निगा राखण्याचा निश्चय करण्यात आला. परिसरात यापुढेदेखील वृक्षारोपण करणार असल्याचे मालुसरे व भणगे यांनी सांगितले.

# नेरूळमध्ये एलईडी लाईटची सुविधा

## भाजप कामगार मोर्चाच्या सुहासिनी नायडू यांचा पाठपुरावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळ येथील सेक्टर ४ येथील वॉर्ड ऑफिस ते वाधवा सोसायटीला असलेल्या निर्मनुष्य रस्त्यावर अश्लील प्रकार वाढले आहेत. परिसरात लाईटचा प्रकाश कमी असल्याने हे गैरप्रकार वाढत होते. याबाबत परिसरातील नागरिकांनी भाजपच्या कामगार मोर्चाच्या पदाधिकारी सुहासिनी नायडू यांच्या ही बाब लक्षात आणून दिली. नायडू यांनी तातडीने विभाग कार्यालयाशी संपर्क साधत एलईडी लाईट लावून घेत ते सुरू करून घेतले. त्यामुळे परिसर प्रकाशमय झाला आहे.

या मार्गावर अंधार असल्याने प्रेमी युगुले गर्दी करत असून, गरदुल्लल्यांचे प्रमाण वाढले होते. अंधाराचा फायदा घेत दुष्कृत्य तसेच अश्लील गोष्टी घडत होत्या. त्यामुळे परिसरात चिंतेचे वातावरण होते. गर्दुल्ले वाढत असल्याने चोरीच्या घटना वाढण्याची शक्यता होती. महिलांना माना खाली घालून जावे लागत होते. अखेर हा परिसर एलईडी लाईटने प्रकाशमय झाल्याने गैर कृत्यांना लगाम लागण्यास मदत होणार आहे. तसेच या ठिकाणी पोलिसांनी सायंकाळी व रात्री पेट्रोलिंग वाढवावे यासाठी नेरूळ पोलीस ठाण्यात पात्र देण्यात येणार असल्याचे सुहासिनी नायडू यांनी माहिती देताना सांगितले.

वाधवा सोसायटी समोरील व सागर संगम सोसायटी आणि न्यू पाम बीच सोसायटीच्या आलेल्या तक्रारी नुसार सेक्टर ४ येथील वॉर्ड ऑफिस आणि वाधवा रोड तिथे काही अश्लील आणि गर्दुल्ले मुला मुलींचे वाढते प्रमाण यांची तक्रारी अनुसार नवी मुंबई महापालिका वॉर्ड ऑफिसर अमोल पालवे व (विद्युत विभाग) आहेरकर साहेब यांच्याशी संवाद साधून मी त्या प्रभागात डएऊ लाईट लावून घेतली आणि हाश लाईट थोड्याच दिवसात लावण्यात येणार आहे.

नवी मुंबई महापालिका अधिकारी व टीम यांचे मनःपूर्वक आभार. अजून काही तक्रार आणि कुठलाही संवाद करण्यास आपण मला माझ्याशी संपर्क साधू शकता (९७०२०६८२२०), असे नायडू यांनी आवाहन केले आहे.



# नवी मुंबईत राजसाहेब ठाकरे वैद्यकीय सेवा कक्ष सुरू

## 'शिवतीर्थ'वर पोस्टरचे अनावरण



**नवी मुंबई : बातमीदार**

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा आहे. गरजू रुग्णांना मदतीचा हात द्या, असा सल्ला कायम राज ठाकरे देत असतात. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत शुक्रवारी (दि. १४) नवी मुंबई मनसेच्या वतीने राजसाहेब ठाकरे वैद्यकीय सेवा कक्षाच्या पोस्टरचे अनावरण आज शिवतीर्थावर राज ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राज यांनी उपक्रमाची स्तुस्ती करून शुभेच्छा दिल्या, व मार्केट, मंदिरे, रेल्वे स्टेशन, अश्या विविध गर्दीच्या ठिकाणी सदर पोस्टर लावण्याच्या अश्या सूचना या वेळी दिल्या.

यंदा राज ठाकरे यांचा वाढदिवस नवी मुंबई मनसे अनोख्या पद्धतीने साजरा करत आहे. राज ठाकरे यांच्या ५६व्या वाढदिवसाचे औचित्य साधून नवी मुंबई मनसेच्या वतीने नवी मुंबईकरांसाठी राजसाहेब ठाकरे वैद्यकीय सेवा कक्ष सुरू करण्यात येत आहे. नवी मुंबई मनसेचे आरोग्यदूत वैद्यकीय सेवा देत जनतेच्या सेवेसाठी या माध्यमातून कायम तत्पर असणार असल्याचे मत नवी मुंबई शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी व्यक्त केले आहे. अनेकदा रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना प्रशासकीय काम, इतर वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी मदतीची गरज असते. अनेकवेळा रुग्ण हा अत्यंत नाजूक परिस्थितीत असतो. त्याच्यासोबत बाहेरून आलेले नातेवाईक हे एक किंवा दोन व्यक्ती असतात. अनेकवेळा नातेवाईकही भांबावलेल्या स्थितीत असतात. नेमकं हॉस्पिटल परिसरामध्ये कुठे काय आहे? कुठे कोणत्या चाचण्या केल्या जातात. कागदपत्रांची पूर्तता कशी केली जाते. त्यासाठी कुठे जावे लागते. याबाबत अधिक माहिती नसलेले नातेवाईक यांना मदत करण्याचे मोलाचे काम आता मनसेचे आरोग्यदूत करणार आहेत तसेच रुग्णालयात बेडची उपलब्धता करून देणे, खासगी रुग्णालयात बहुतेकदा सर्व सामान्य रुग्णाची हॉस्पिटल बिलांच्या वेळी आर्थिक पिळवणूक केली जाते त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले जाणार आहे, रुग्णांना औषध उपचार दरम्यान टाळाटाळ केली जाते. ज्येष्ठ नागरिकांना उपचारा दरम्यान धावपळीचा नाहक त्रास होतो, या व अशा प्रकारच्या अनेक बाबींन पासून नागरिकांना दिलासा मिळावा या हेतूने मनसेचा वैद्यकीय कक्ष यापुढे चोवीस तास कार्यरत राहणार आहे, असे गजानन काळे यांनी सांगितले.

नवी मुंबई मनसेकडून मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक ही जारी करण्यात आला आहे. ९८३३१११२७ या क्रमांकावर गरजूंनी संपर्क केल्यास मनसेचे आरोग्यदूत त्यांच्या मदतीसाठी हजर असणार आहेत.

या वैद्यकीय कक्षा अंतर्गत रुग्णसेवेला अधिक गती मिळणार असून गोर गरीबांना, सर्वसामान्य जनतेला संकटात सोबती म्हणून 'महाराष्ट्र सैनिक' कायम सोबत असेल. मनसेची पूर्ण टीम रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा ध्यास घेऊन काम करणार आहे. रुग्ण बरा झाल्यानंतर यामध्ये उचललेल्या खारीच्या वाट्याचं समाधान आम्हाला मिळेल यासाठी हा अनोखा उपक्रम राबवत आहोत आणि त्याला यश ही मिळेल, असा विश्वास गजानन काळेंनी या वेळी व्यक्त केला. या वैद्यकीय कक्षाचे कामकाज वैद्यकीय दुत म्हणून आप्पासाहेब कोठुळे, अजय मोरे, सुहास मिंडे, संदेश डोंगरे, सागर विचारे, शरद डीगे, नितीन नाईक, निखिल थोरात, संदीप सिंग बघणार आहेत.

# कर्णबधिर व्यक्तीला तब्बल सात वर्षांनंतर मिळाली ऐकण्याची क्षमता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राजेंद्र जैन (वय ४४) गेली सात वर्षे बहिरेपणाने त्रस्त होते, पण आता त्यांना ऐकण्याची क्षमता परत मिळाली आणि त्यामुळे उपजीविकादेखील परत मिळाल्याने जीवनात नवा आनंद, नवी आशा निर्माण झाली आहे.

ही किमया घडून आली कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईमध्ये यशस्वीपणे करण्यात आलेल्या, जीवन बदलवून टाकणाऱ्या कोक्लियर इम्प्लान्ट सर्जरीमुळे जैन यांना आता आवाज, संगीत पुन्हा ऐकू येऊ लागले आहेत, जीवन परिपूर्ण होण्याची आशा पुन्हा एकदा निर्माण झाली आहे.



सात वर्षांपूर्वी श्री जैन यांनी ट्युबरक्युलोसिससाठी घेतलेल्या औषधांचा विपरीत परिणाम होऊन त्यांची ऐकण्याची क्षमता पूर्णपणे लोप पावली, तेव्हापासून ते बहिरेपणाने त्रस्त होते. अनेक वेगवेगळ्या क्लिनिक्समध्ये वेगवेगळे उपचार करून घेतले, हीयरिंग एड्स वापरून पाहिली पण त्यांची ऐकण्याची क्षमता अधिकाधिक कमी होत गेली आणि पूर्ण बहिरेपणा आला. यामुळे त्यांचे संपूर्ण जीवन उद्ध्वस्त झाले. बहिरेपणामुळे त्यांना नोकरी गमवावी लागली.

जैन यांना कोक्लियर इम्प्लान्ट्सबद्दल माहिती होती. गंभीर बहिरेपणा आलेल्या व्यक्तीची ऐकण्याची क्षमता ही इलेक्ट्रॉनिक साधने पुन्हा मिळवून देऊ शकतात, त्यामुळे जैन यांना त्यामध्ये आशेचा किरण दिसला.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईचे डायरेक्टर आणि हेड, डॉ. बिपीन चेवले म्हणाले, सहज उपलब्ध होऊ शकेल अशी, उत्तम दर्जाची आरोग्य सेवा देखभाल समाजातील प्रत्येक व्यक्तीला मिळावी यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत आणि त्याची पूर्तता करत असल्याचा आम्हाला अतिशय अभिमान आहे. आर्थिक परिस्थिती कशीही असो, जीवन बदलवून टाकणाऱ्या वैद्यकीय उपचारांचा लाभ प्रत्येक व्यक्तीला मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे हे श्री जैन यांच्या केसमधून दिसून येते.

औदार्य आणि जीवनात सुधारणा घडवून आणण्याप्रती निष्ठा यांच्या आधारे नावीन्य या आमच्या हॉस्पिटलच्या सिद्धांताचे पालन आम्ही सातत्याने करून येत आहोत हे यामधून दिसून येते.

# प्रकाश मोहितेंचा सेवानिवृत्ती समारंभ

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील दादरपाडा येथील राहणारे प्रकाश बाळू मोहिते हे नेव्हल अर्ममेंट डेपो करंजा येथून प्रदीर्घ सेवेतून नुकतेच निवृत्त झाले. त्यांचा सेवानिवृत्ती व वाढदिवस सोहळा दादरपाडा तालुका उरण येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला. आलेल्या सर्व पाहुण्यांनी शुभेच्छा दिल्या.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त महाप्रबंधक (भा.नौ. आ.से.) पी.कुप्पूसामी, उप महाप्रबंधक क्षेपणास्त्र प्रशांतशेखर सिंग, फोरमन एन.के.विश्वकर्मा आदी तर वरिष्ठ भंडार अधीक्षक आशिष शर्मा, संजय सिंग, योगेश म्हात्रे, मिलिंद थळी, अविनाश मुरुडकर, सुजित शिरदोनकर, युनियन प्रतनिधी दीनदयाळ गवस, सुनील मोहोकर व मित्र परिवार महादेव बंडा, सुरेश बंडा, कमलाकर चिमणे, विष्णू मोहिते, पद्माकर पाटील, सुभाष ठाकूर, विलास पाटील, जयदेव ठाकूर, वसंत मोहिते, अजित पाटील, प्रदीप तांडेल, प्रकाश मुंबईकर, जगदीश गावंड, रमण कासकर, रवींद्र कासुकर, मदन पाटील आदी उपस्थित होते.




# टोमॅटोच्या दरात वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या चार ते पाच महिन्यापासून स्थिर असलेले टोमॅटोच्या दराने उसळी घेण्यास सुरुवात केली आहे. किरकोळ आणि घाऊक बाजारात टोमॅटोचे दर वधारले आहेत. परराज्यातून आणि महाराष्टातुन होणारी टोमॅटोची आवक कमी झाल्याने टोमॅटोचे भाव वाढले असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे. बाजारात बुधवारी ४८ गाडी आवक झाली असून घाऊक मध्ये आठ रुपयांनी तर किरकोळ बाजारात दुपट्टीने वाढ झाली आहे. घाऊकमध्ये आधी २०-२४ रुपयांनी उपलब्ध असलेले टोमॅटो आता २८-३२ रुपयांवर पोहचले आहेत.

वाशीतील एपीएमसी बाजारात टोमॅटो कमी प्रमाणात दाखल होत आहे. परिणामी आवक कमी आणि मागणी जास्त यामुळे दरवाढ झालेली आहे. मागील आठवड्यात दोन हजार क्विंटलहुन अधिक टोमॅटो दाखल होत होते ते आता एक हजार ८०० क्विंटल दाखल होत आहेत. पावसामुळे उत्पादन खराब होत तसेच शेतातून उत्पादन घेण्यास अडचणी येत आहेत,



त्यामुळे बाजारात आवक कमी झाली आहे. महाराष्ट्रतुन सातारा,सांगली आणि संगमनेर तर बंगळूरमधून टोमॅटो दाखल होतात. मागील वर्षी जुलै मध्ये टोमॅटोच्या दराने उच्चांक गाठला होता.

किरकोळ बाजारात १५० ते १८० रुपयांवर तर घाऊक बाजारात १०० ते ११० रुपयांपर्यंत पोहचले होते, मात्र ऑगस्टनंतर टोमॅटोचे दर उतरले होते ते आतापर्यंत टोमॅटोचे दर आवाक्यात होते, मात्र आता पुन्हा टोमॅटोच्या दाराने उसळी घेतली असून घाऊक बाजारात प्रतिकिलो २८ ते ३२रुपये तर किरकोळ बाजारात ८० रुपयांनी विक्री होत आहे.

दरम्यान, पावसामुळे अनेक पालेभाज्यांची आवक घटली आहे. मोजकाच साठा व मागणी अधिक असल्याने दरात वाढ झाली आहे.

## निवडक




### स्त्रियांचे आरोग्य पुस्तकाचे प्रकाशन

**पाली** : ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या प्रख्यात स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. राजश्री दयानंद कटके लिखित स्त्रियांचे आरोग्य या पुस्तकाचे प्रकाशन बुधवारी (दि.१२) विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी आमदार भारती लव्हेकर, डॉ. तात्याराव लहाने, पद्मा धामणे राव, पत्रकार राही भिडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. कटके यांच्या मातोश्री आणि सासरे मंचावर उपस्थित होते. पुस्तकाचे प्रकाशन झाल्याचे जाहीर करून डॉ. गोऱ्हे यांनी हे फार महत्त्वाचे आणि सोप्या भाषेत लिहिलेले पुस्तक आहे, अशी पुस्तकाबद्दल प्रशंसा केली. सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज दळवी यांनी केले.

### चौलमध्ये १० सोलर हायमास्ट दिवे

**रेवदंडा** : चौल शिवसेनेच्या मागणीनुसार आमदार महेंद्र



दळवी यांच्या आमदार निधीतून १० सोलर हायमास्ट दिवे प्रकाशमय झाले आहेत. ग्रामपंचायत हद्दीतील आग्राव राम मंदिर, सोंडेपार, आग्राव मच्छीमार्केट, सराई, हनुमानपाडा, बेलाई, चौलमळा राममंदिर, भाटगल्ली, जाखमाता, महाकालीमंदिर कालिकाटाकी या ठिकाणी सोलर हायमास्ट दिवे लावण्यात आले आहेत. हे सोलर पॉवरवर चालणारे दिवे आहेत. याबद्दल कार्यकर्ते प्रशांत शेणवईकर यांनी त्यांचे आभार मानले.

### निर्लेखित साहित्य विक्रीसंदर्भात आवाहन

**रायगड** : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड या संस्थेतील वापरुन निर्लेखित झालेल्या साहित्याची विक्री निविदा पद्धतीने करण्यात येणार आहे. यामध्ये हत्यारे, उपकरणे व लाकडी फर्निचरचा समावेश असून इच्छुक जीएसटी नोंदणीधारक खरेदीदारांनी निविदा सादर कराव्यात, असे आवाहन प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड एन. एस. पुरकर यांनी केले आहे. सादर करावयाच्या विहीत नमुन्यातील निविदा अर्ज ३०० रु. ना परतावा किमतीत संस्थेच्या कार्यालयामधून विकत घेता येईल. या नमुन्यातील पूर्ण माहिती अचूकपणे भरलेली निविदा अर्जासोबत पाच हजार अनामत रक्कम जमा करणे गरजेचे असेल या रकमेचा भरणा प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड, जि. रायगड या नावाने डीडीच्या स्वरुपात करावा. सीलबंद निविदा २५ जून रोजी दुपारी २.३० वा. संस्थेच्या प्राचार्याच्या कक्षात उघडण्यात येतील.

# आंबा बागायतदारांचा विमा हप्ता आता निम्म्यावर

## खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरेंच्या प्रयत्नांना यश

**श्रीवर्धन : बातमीदार**

रायगडमधील पारंपरिक पीक असलेल्या आंबा, काजू या पिकांसाठी विमा संरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. रायगडमध्ये घेतल्या जाणाऱ्या या पिकाव्यतिरिक्त राज्यातील इतर विभागातील नऊ पिकांसाठी ३० जिल्ह्यांमध्येही पीक विमा योजना राबवण्यात येत आहे. वातावरणातील दिवसेंदिवस होणारे लक्षणीय बदल लक्षात घेता फळपीक घेणाऱ्या शेतकऱ्यास अपेक्षित उत्पन्न प्राप्त होत नाही. या बाबीची दखल घेत राज्य सरकारने सदरची पीक विमा संरक्षण योजना अंमलात आणली आहे. कोकणातील शेतकऱ्यांसाठी सदरची योजना किमान दहा गुंठ्यांमध्ये राबवण्याची संधी देण्यात आली आहे. खासदार सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांनी रायगडमधील फळपिकाबाबत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे रायगड जिल्ह्यासाठी फळबाग विमा योजनेत बदल करण्यासाठी आग्रही मागणी केली होती. याबाबत कृषीमंत्री यांचे अध्यक्षतेखाली संबंधित शेतकऱ्यांसह



बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आंब्याच्या विमा हप्त्यामध्ये ५० टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे.

मागील वर्षी शेतकऱ्यांना आंबा पिकासाठी प्रति हेक्टर २९ हजार रुपये विमा हप्ता भरावा लागत होता, आता मात्र प्रति हेक्टर १४,४५० रुपये एवढाच हप्ता भरावा लागणार आहे. या विम्यानुसार आंब्यासाठी संरक्षित रक्कम एक लाख ७० हजार रुपये तर काजू एक लाख २० हजार एवढी रक्कम प्राप्त होणार आहे. आंब्याच्या विमा हप्त्यामध्ये ५० टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना निश्चितच दिलासा मिळत आहे.

नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमध्ये फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, पिकाच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, शेतकऱ्याला नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहित करणे, कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे, जेणेकरून उत्पन्नातील जोखमेवरून शेतकऱ्याच्या संरक्षणाबरोबरच अन्नपुरवठा, पिकांचे विविधीकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हा हेतू साध्य करणे ही या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. ही योजना फळपिकासाठी असून पूर्णतः ऐच्छिक आहे. भाडेपट्टा किंवा कुळ यांनासुद्धा या योजनेचा लाभ घेता येतो.

**माझे मतदारसंघातील व जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आंबा पिकासाठी विम्याची मागणी केली होती. कोकणातील शेती लक्षात घेता आंबा व काजू ही दोन्ही अतिशय महत्त्वाची पीके आहेत. राज्य सरकारने विमा योजना सुधारीत केली आहे. कोकणातील शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. शेतकऱ्याच्या आर्थिक स्थैर्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे.**
**–आदिती तटकरे,**
**महिला व बालविकासमंत्री**

**श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांची आंब्याच्या विमासंदर्भात मागणी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे करण्यात आली होती. शेतकऱ्यांच्या मागणीचा पाठपुरवठा केल्याबद्दल खासदारांचे आभार!**
**–सागर विचारे, शेतकरी**

## प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी मुरूड पालिका कर्मचाऱ्यांचे निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्य नगर परिषद, नगरपंचायत कर्मचारी व संवर्ग संघर्ष समितीच्या प्रलंबित असलेल्या विविध मागण्या मान्य करण्याकरिता मुरूड नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



या वेळी मुरूड नगर परिषद कामागार संघटनेचे अध्यक्ष राकेश पाटील, उपाध्यक्ष प्रकाश आरेकर, खजिनदार संजय वेटकोळी, परेश कुंभार, नरेंद्र नांदगांवकर, सतेज निमकर, सुदेश माळी, स्वप्नजा विरुकुड, उमेश शिंदे, जयेश चोडणेकर, संजय बामगुडे, प्रणाली करडे, मितेश माळी, दिपक शिंदे, रिया मांढरे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत २० मार्च २०२३ रोजी बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत नगर परिषद, नगरपंचायतीमधील प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय मुख्य सचिव, वित्त सचिव, नगरविकास सचिव सामाजिक न्याय विभाग सचिव आणि आयुक्त यांच्या उपस्थितीत घेतले होते, परंतु त्यांची अद्यापपर्यंत अंमलबजावणी न झाल्यामुळे लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

निवदेनाची प्रत मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी रायगड, नगरविकास विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आली आहे, असे संघटनेचे अध्यक्ष राकेश पाटील यांनी सांगितले.

## पोलादपूर-महाबळेश्वर रस्त्यावर दरड

**महाड : रामप्रहर वृत्त**

मागील वर्षी सह्याद्रीच्या पर्वतरांगात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाल्याने पोलादपूर–महाबळेश्वर रस्त्यावर गुरुवारी (दि.१३) सकाळी १० वा. च्या सुमारास दरड कोसळली. त्यामुळे एकेरी वाहतूक चालू होती, मात्र काही वेळाने येथील दरड हटवल्याने पुन्हा हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा झाला आहे.

सातारा व रायगड जिल्ह्याला जोडणारा महाबळेश्वर घाट हा रायगड जिल्ह्यातील रहिवाशांना एकमेव रस्ता असून दरवर्षी या घाटात मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळून वाहतूक बंद होते.

मागील वर्षी सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाल्याने त्याचा परिणाम पोलादपूर–महाबळेश्वर रस्त्यावर झाला व घाटामध्ये मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन डोंगरावरील माती व दगड गोटे रस्त्यावर आल्याने हा मार्ग अनिश्चित काळासाठी बंद झाला होता. त्यानंतर या रस्त्यावरील काही धोकादायक ठिकाणी पुन्हा डोंगरावरील माती येऊ नये यासाठी संरक्षक भिंतीची कामे करण्यात आली, मात्र ही कामे करूनदेखील पुन्हा दरड कोसळत असल्याने घाटमार्ग धोकादायक बनला आहे.



## तळा शहराच्या प्रवेशद्वारावरील रस्त्याची अखेर डागडुजी



**तळा : रामप्रहर वृत्त**

तळा शहराच्या प्रवेशद्वारावरील रस्त्याची झालेल्या दूरवस्था झाल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत होता. अखेर नगरपंचायतीकडून डागडुजी करण्यात आल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

तळा शहराच्या प्रवेशद्वारावर माझी वसुंधरा अभियानांतर्गत झाडे लावून सुशोभीकरण करण्यात आले आहे. या झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी रस्ता खोदून पाईपलाईन टाकण्यात आली होती, मात्र खोदण्यात आलेल्या रस्त्याची डागडुजी करण्यात आली नसल्याने दिवसेंदिवस हा रस्ता उखडून त्याची अत्यंत दूरवस्था झाली होती. यामुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. पावसाळा तोंडावर आल्याने पावसाळ्यात रस्त्याची आणखी दूरवस्था होऊन अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता होती.

अखेर नगरपंचायत प्रशासनाकडून या रस्त्याची डागडुजी करण्यात आल्याने या रस्त्यावरून प्रवास करणारे वाहनचालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



**माणगाव** : महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा नुकताच रायगड किल्ल्यावर साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अजय भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता अभियान पार पडले. या स्वच्छता अभियानात महाडमधील हिरवळ महाविद्यालयाने उत्स्फूर्त सहभाग घेत किल्ले रायगड स्वच्छ केला.

## चौकमधील विविध समस्या सोडविण्याची भाजपकडून मागणी

**चौक : प्रतिनिधी**

चौक ग्रामीण रुग्णालय, गावातील अर्धवट रस्ते व गटारांची पूर्तता करण्यासाठी चौक शहर भाजपच्या वतीने शासन दरबारी निवेदन देण्यात आले.

चौक गावातील रस्ते व गटारे मंजूर झाली असून सध्या ती अर्धवट अवस्थेत आहेत. निधी मंजूर असतानादेखील बाजारपेठेतील मुख्य गटारे आणि रस्ते न झाल्याने पावसाळ्यात नागरिक व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागणार आहे. जुन्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत, तर गटारे नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचून दुकाने आणि घरांत शिरण्याची शक्यता आहे. निधी मंजूर असतानाही ही कामे का शिल्लक राहिली असा सवाल भाजप नेते विनोद भोईर यांनी उपस्थित केला.

याची चौकशी होणे गरजेचे असून सर्व रस्ते, गटारांची मापे योग्य असताना रस्ते, गटारांना निधी का शिल्लक राहिला नाही, असाही प्रश्न निर्माण होत आहे, असे शहर अध्यक्ष गणेश कदम यांनी सांगितले.

ग्रामीण रुग्णालयात जाणारा रस्ता अरूंद आहे. जुना मुंबई–पुणे महामार्ग हा बाजारपेठेच्या बाहेरून जातो. याच मार्गावर बंद अवस्थेतील शासकीय विश्रामगृहाच्या जागेवर ग्रामीण रुग्णालय उभारल्यास सर्वांच्या सोयीचे होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देताना अभिजीत देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## शाश्वत जल परीक्षणात श्रीवर्धन ठरले अव्वल

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

जगातील सर्वप्रथम नामक डिजिटल वॉटर बँक सुरू करण्यात आलेल्या संस्थेमार्फत श्रीवर्धन शहराची या घटकांकरिता गुणवत्ता तपासणी करण्यात आली होती. या सर्व्हेमध्ये श्रीवर्धन नगर परिषदेस ६२.५१ इतकी गुणसंख्या प्राप्त झाली असून श्रीवर्धन नगर परिषद ही मानांकन प्राप्त करणारी महाराष्ट्र राज्यातील प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्था ठरली आहे.



'जल' या अतिमहत्त्वाच्या घटकाच्या गुणवत्तेची पारदर्शकता राखण्यासाठी त्याचे लेखापरीक्षण आणि पाण्याचे शाश्वत गुणांकन होणे आवश्यक आहे, ज्यातून श्रीवर्धन शहरातील पाण्याचा सुयोग्य वापर, पाण्याचे स्त्रोत आणि त्यांची क्षमता, पाण्याचा आवश्यक पुरवठा होत आहे की, नाही आदींची तपासणी या संस्थेमार्फत करण्यात आली होती. मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या पुढाकाराने श्रीवर्धन शहराचे शाश्वत जल परीक्षण करणे शक्य झाले आहे.

नुकतेच पूर्ण झालेल्या जलपुरवठा प्रकल्पामुळे श्रीवर्धन शहरातील पाण्याच्या सुयोग्य वापरास चालना मिळेल, असा विश्वास मुख्याधिकारी लबडे यांनी व्यक्त केला आहे.

## रेवदंड्यातील अवजड वाहतूक बायपासमार्गे वळवावी

### ग्रामस्थांसह प्रवासीवर्गाची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेत सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीने ग्रामस्थ व प्रवासीवर्ग त्रस्त झाले आहेत. येथील रस्ता अरूंद असून अजवड वाहतूक ही रेवदंडा बायपास मार्गे वळवावी, अशी मागणी ग्रामस्थ व प्रवासीवर्ग करीत आहेत.



रेवदंडा बाजारपेठतील रस्ता अरूंद असल्याने दोन अवजड वाहने एकाच वेळी जाताना वाहनचालकांना कसरत करावी लागते. शिवाय मुरूड पर्यटनक्षेत्र असल्याने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुकीत वाढ झाली आहे. रेवदंडा बाजारपेठेत मुरूड व अलिबागकडे जा–ये करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली असून सातत्याने या रस्त्यावर वर्दळ सुरू असते, मात्र अरूंद रस्त्याने दोन अवजड वाहने एकाच वेळी जाताना फारच त्रासदायक असते. शिवाय नवख्या वाहनचालकाची खूप गडबड उडते. वाहतूक कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील रस्त्याचे रूंदीकरण करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे रेवदंडा बायपास रस्ता सुरळीत असल्याने चौलनाका येथून तसेच रेवदंडा मोठे बंदर येथून अवजड वाहने वळवावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि.१३) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २८८ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख १८ हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे.

पुणे–कल्याणीनगर येथे झालेल्या अपघातानंतर वाहतूक पोलिसांनी आपली कारवाई तीव्र केली असून यामुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## वॉटरमेनशिप ट्रेनिंग कोर्समध्ये होमगार्ड निलेश मोकल यांचे यश



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य महासमादेशक होमगार्ड यांच्याकडून प्रथमच मानसेवी होमगार्ड सदस्यांना राष्ट्रीय पातळीवर आयोजित वॉटरमेनशिप ट्रेनिंग कोर्स बंगळुरू येथे उपलब्ध करून देण्यात आला. या प्रशिक्षणासाठी होमगार्ड जिल्हा समादेशक व अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी निलेश मोकल यांची निवड केली होती. त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करीत अथक परिश्रम करून द्वितीय क्रमांक पटकावला व रौप्य पदक मिळविले.

या प्रशिक्षण अभ्यासक्रमात देशभरातून प्रशिक्षणार्थी उपस्थित झाले होते. अभ्यासक्रमामध्ये प्रथमोपचार, पूरविमोचन, पोहण्याची साधने तयार करणे, तरंगण्याची साधने तयार करणे, तराफा तयार करणे, पाण्यांत उंचावरुन उडी मारणे, बुडणाऱ्या व्यक्तीस विविध पद्धतीने वाचविणे आदी विषयांचे व्याख्यान व प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींची लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली.

निलेश मोकल यांनी वरिष्ठांनी त्यांचेवर दाखविलेला विश्वास सार्थ करून महाराष्ट्र होमगार्ड संघटनेचे तसेच रायगड जिल्हा होमगार्डचे नाव उंचावले आहे. त्यांनी केलेल्या कामगिरीचे अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी कौतुक करून प्रशंसापत्र देऊन सन्मानित केले.

# इंग्लंडचा ओमानवर ऐतिहासिक विजय

## टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात सर्वांत मोठी कामगिरी

**अँटिगा : वृत्तसंस्था**

इंग्लंडच्या संघाने ओमानविरुद्ध अँटिगा येथील सर व्हिव्हियन रिचर्ड्स स्टेडियमवर झालेल्या सामन्यात आश्चर्यकारक कामगिरी केली. या सामन्यात त्यांनी ओमानविरुद्ध मोठा विजय नोंदवला, ज्यामुळे ते अजूनही सुपर ८च्या शर्यतीत आहेत. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना ओमानला अवघ्या ४७ धावांत ऑलआउट केले. त्यानंतर ३.१ षटकांत आठ विकेट्स राखून लक्ष्याचा पाठलाग केला.



इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून ओमानविरुद्ध प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अशा स्थितीत इंग्लंडच्या भेदक गोलंदाजीसमोर ओमानचे फलंदाज चांगलेच फसले. हा संघ १३.२ षटकांत अवघ्या ४७ धावांवर ऑलआऊट झाला. ओमानकडून शोएब खानने सर्वाधिक ११ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडून आदिल रशीदने सर्वाधिक चार विकेट घेतल्या. याशिवाय मार्क वूड आणि जोफ्रा आर्चरने प्रत्येकी तीन गडी बाद केले.

ओमानचे फलंदाज ज्या खेळपट्टीवर सतत संघर्ष करताना दिसत होते. त्या खेळपट्टीवर इंग्लंडच्या आघाडीच्या फलंदाजांनी कहर केला. ४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाला फारसा वेळ लागला नाही. इंग्लंडने अवघ्या ३.१ षटकांत लक्ष्याचा पाठलाग केला, ज्यामुळे त्यांच्या नेट रन रेटमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. कर्णधार जोस बटलरने ३००च्या स्ट्राईक रेटने आठ चेंडूंत नाबाद २४ धावा केल्या. त्याने या खेळीत चार चौकार आणि एक षटकार लगावला. फिल सॉल्टने तीन चेंडूंत १२, तर जॉनी बेअरस्टोने दोन चेंडूंत आठ धावा केल्या. ओमानकडून बिलाल खान आणि कलीमुल्ला यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

ब गटातून तीनपैकी तीन सामने जिंकून ऑस्ट्रेलिया आधीच सुपर ८साठी पात्र ठरला आहे. तीनपैकी दोन सामने जिंकल्यानंतर आणि एक सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर स्कॉटलंड पाच गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडचा ओमानच्या सामन्यापूर्वी स्कॉटलंडपेक्षा चांगला रन रेट नव्हता, पण आता इंग्लंडचा नेट रन रेट (+३.०८१) स्कॉटलंड (+२.१६४) पेक्षा चांगला झाला आहे. इंग्लंडचे सध्या तीन सामन्यांतून तीन गुण आहेत. जर त्यांनी त्यांचा पुढील सामना नामिबियाविरुद्ध जिंकला आणि स्कॉटलंडने त्यांचा शेवटचा गट स्टेज सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध गमावला तर इंग्लंड सुपर ८साठी पात्र ठरेल.

### श्रीलंकेचा विक्रम मोडला

इंग्लंडने ओमानवर अवघ्या ३.१ षटकांत विजय मिळवून मोठा इतिहास रचला. यासह पुरुषांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात ही कामगिरी करणारा पहिला संघ ठरला आहे. इंग्लंडने ओमानवर सर्वाधिक १०१ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. यापूर्वी हा विक्रम श्रीलंकेच्या नावावर होता. श्रीलंकेने २०१४मध्ये नेदरलँडविरुद्ध टी-२० विश्वचषक सामना ९० चेंडू शिल्लक असताना जिंकला होता.

# अफगाणिस्तानची सुपर ८मध्ये धडक

**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तान संघ सलग तिसरा सामना जिंकत टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ फेरीत पोहचला आहे. अफगाणिस्तानने त्यांच्या तिसऱ्या साखळी सामन्यात पापुआ न्यू गिनीला ९५ धावांवर गुंडाळले आणि नंतर अवघ्या १५.१ षटकांत तीन गडी गमावून १०१ धावा करीत विजय मिळवला. अफगाणिस्तानचा फझलहक फारुकी तुफान फॉर्मात असून तीन विकेट्स घेत या सामन्याचा सामनावीरही ठरला.

अफगाणिस्तानविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना पापुआ न्यू गिनीची सुरुवात खराब झाली. १२ धावांवर संघाने तीन विकेट्स गमावल्या. त्यामुळे अफगाणिस्तानच्या भेदक माऱ्यासमोर संघाला ९५ धावांपर्यंत मजल मारता आली. अफगाणिस्तानकडून फझलहक फारुकीने १६ धाव देत तीन गडी बाद केले. नवीन उल हकने दोन आणि नूर अहमदने एक विकेट मिळवली.

प्रत्युत्तरात अफगाणिस्तान संघाची सुरुवात चांगली झाली नाही. संघाच्या सलामीवीरांनी झटपट विकेट गमावल्या, पण गुलबदीन नायबने संघाचा डाव उचलून धरला. गुलबदीनने ३६ चेंडूंत चार चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ४९ धावा केल्या, तर मोहम्मद नबीने २३ चेंडूंत एका चौकाराच्या मदतीने १६ धावांची नाबाद खेळी करीत संघाला सुपर ८चे तिकीट मिळवून दिले. आता त्यांना १८ जून रोजी यजमान वेस्ट इंडिजविरुद्ध शेवटचा साखळी सामना खेळायचा आहे.

### न्यूझीलंड विश्वचषकाबाहेर



#### तीन संघांचे आव्हान संपुष्टात

अफगाणिस्तानच्या विजयासह क गटात मोठा बदल पहायला मिळाला. क गटातून वेस्ट इंडिजसह अफगाणिस्तान सुपर ८मध्ये धडक मारली आहे. अफगाणिस्तानच्या विजयाचा थेट परिणाम तीन संघांवर झाला आहे. आता क गटातील तीन संघ सुपर ८च्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत, ज्यामध्ये सर्वांत मोठे नाव न्यूझीलंडचे आहे. न्यूझीलंडने आतापर्यंत दोन सामने खेळले असून किवी संघाला एकही सामना जिंकता आलेला नाही. न्यूझीलंडसह पापुआ न्यू गिनी आणि युगांडा हे संघही विश्वचषकातून बाहेर पडले आहेत.

# राफेल नदालची विम्बल्डनमधून माघार

**लंडन : वृत्तसंस्था**

स्पेनचा आघाडीचा टेनिसपटू राफेल नदालने या वर्षीच्या विम्बल्डन स्पर्धेत खेळणार नसल्याचे जाहीर केले आहे. नदालच्या कारकीर्दीतले हे अखेरचे वर्ष मानले जात असून आता यापुढे तो विम्बल्डनमध्ये कधीच दिसणार नाही हे स्पष्ट झाले. नदालने २००८ आणि २०१०मध्ये येथे विजेतेपद मिळविले आहे. समाजमाध्यमावरून नदालने आपण या स्पर्धेत खेळणार नसल्याचे जाहीर केले.



गेल्याच महिन्यात नदालला फ्रेंच टेनिस स्पर्धेत पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला होता. पॅरिस ऑलिम्पिकवर लक्ष केंद्रित करण्यासाठी नदालने हा निर्णय घेतला असावा असे मानले जात आहे. नदाल ऑलिम्पिकमध्ये कार्लोस अल्कराझच्या साथीत दुहेरीची लढत खेळणार असून एकेरीतही तो खेळण्याची शक्यता आहे.

नदाल म्हणाला, फ्रेंच स्पर्धे दरम्यानच मला भविष्यातील सहभागाविषयी विचारण्यात आले होते. मी सध्या क्ले कोर्टवर सराव करीत आहे आणि ऑलिम्पिकदेखील क्ले कोर्टवरच (लाल माती) होणार आहे. माझी ही अखेरची ऑलिम्पिक स्पर्धा असेल. शरीरही आता फारशी साथ देत नाही. खेळत आहे तोवर आता क्ले कोर्टवर खेळणार आहे. त्यामुळे मी यावेळी विम्बल्डनमध्ये खेळू शकणार नाही.

> **विम्बल्डन येथील वातावरण, प्रेक्षक यांनी नेहमीच मला प्रोत्साहन दिले आहे. येथे खेळण्याचा आनंद वेगळाच असतो. मला असा निर्णय घेताना खूप दु:ख होत आहे.**
>
> **-राफेल नदाल**

# भारताची बुद्धीबळपटू दिव्या देशमुख जगज्जेती

**गांधीनगर : वृत्तसंस्था**

भारताची आंतरराष्ट्रीय मास्टर दिव्या देशमुखने कनिष्ठ गटाच्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या गटात विजेतेपद मिळवले. दिव्याने अखेरच्या फेरीत बल्गेरियाच्या बेलोस्लाव क्रास्तेवाचा पराभव केला. दिव्याची ‘लाइव्ह रेटिंग’ २४६४ असून या कामगिरीनंतर तो जगातील आघाडीच्या २० महिला बुद्धिबळपटूंमध्ये सहभागी झाली आहे.



अखेरच्या फेरीतील विजयासह दिव्याने ११ फेऱ्यांच्या स्पर्धेत १० गुणांसह निर्विवाद वर्चस्वासह विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अर्मेनियाची मरियम मकरतच्यान दुसऱ्या स्थानावर राहिली. दिव्याने मरियमला अवघ्या अर्ध्या गुणाने मागे टाकले. अखेरच्या फेरीत मरियमने एकतर्फी लढतीत भारताच्या रक्षिता रवीचा पराभव करून तिच्या पदकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले. अझरबैजानच्या अयान अल्लाहवेरदियेवाने रशियाच्या नॉर्मन सेनियाचा पराभव करून ८.५ गुणांसह कांस्यपदक पटकावले.

स्पर्धेत नागपूरच्या १८ वर्षीय दिव्याने आपली छाप पाडली. दिव्याने क्वीन पॉन पद्धतीने सुरुवात करताना डावाच्या मध्यात बेलोस्लावविरुद्ध आपली बाजू भक्कम ठेवली होती. अचूक चाली करीत दिव्याने बेलोस्लाववरील दडपण वाढवत डावावरील पकड घट्ट केली. ही पकड दिव्याने अखेरपर्यंत निसटू दिली नाही आणि विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

### खुल्या गटात काजिबेक विजेता

खुल्या गटात कझाकस्तानच्या नोगेरबेक काजिबेकने अखेरच्या फेरीपर्यंत आघाडीवर असलेल्या अर्मेनियाच्या मामिकोन घारबयानचा पराभव करून विजेतेपद मिळवले. टायब्रेकमध्ये सर्वोत्तम सरासरीवर नोगेरबेकने अर्मेनियाच्या एमिन ओहानयनला मागे टाकले. नोगेरबेक आणि एमिन दोघांचेही ८.५ गुण झाले होते. टायब्रेकमध्ये सरासरी गुणांच्या आधारावर नोगेरबेकला विजयी घोषित करण्यात आले. सर्बियाचा लुका बुदिसावलजेविच आठ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिला. हा निर्णयही टायब्रेकरच्या सरासरी गुणांवर निश्चित झाला. त्याने जर्मनीच्या टोबियास कोलला मागे टाकले.

# बांगलादेशच्या विजयाने श्रीलंकेचे आव्हान संपुष्टात

**किंग्सटाउन : वृत्तसंस्था**

बांगलादेशने टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८ फेरीतील आपले स्थान जवळपास पक्के केले आहे. स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात बांगलादेशने दमदार कामगिरी करीत नेदरलँड्सचा २५ धावांनी पराभव केला. बांगलादेशच्या विजयामुळे गतविजेत्या श्रीलंकेची स्पर्धेतून हकालपट्टी झाली आहे. दहा वर्षांपूर्वी २०२४ मध्ये जेतेपद पटकावणारा श्रीलंका हा विश्वचषकातून बाहेर पडणारा पहिला मोठा संघ आहे.



बांगलादेशचे आता तीन सामन्यांमध्ये चार गुण झाले असुन ते दुसऱ्या स्थानावर आहे. पराभवानंतर नेदरलँड्सला पुढील फेरीसाठी पात्र ठरण्याची आणखी एक संधी आहे. फक्त यासाठी डच संघाला शेवटच्या सामन्यात श्रीलंकेला पराभूत करावे लागेल, तर बांगलादेशला नेपाळकडून पराभवाची अपेक्षा करावी लागेल. किंग्सटाउन, सेंट व्हिन्सेंट येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत आणि पाच बाद १५९ धावा केल्या. त्यानंतर नेदरलँड संघ २० षटकारांत आठ विकेट गमावून केवळ १३४ धावा करू शकला.

बांगलादेशसाठी माजी कर्णधार आणि स्टार आठ चेंडूत शकीब अल हसनने सर्वाधिक ६४ धावा (४६ चेंडू) केल्या. सतत बदनाम होणारा शकीबने आखेर किंवा महत्त्वाच्या सामन्यांमध्ये प्रगती करणाऱ्या संघाला दमदार धावा करीत आघाडी घेतली आहे. त्याच्याशिवाय सलामीवीर तनजीद हसन (३५) आणि महमुदुल्लाह (२५) यांनी उत्कृष्ट खेळ केला. नेदरलँड्सकडून आर्यन दत्त आणि पॉल व्हॅन मीकरेन यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.

नेदरलँड्ससाठी सायब्रँड एंजेलब्रेक्ट, हेल्म्समन स्कॉट एडवर्ड्स आणि विक्रमजीत सिंग (२६) यांनी संघाला चांगली सुरुवात केली, पण संघाला विजयापर्यंत पोहचता आले नाही. एंजेलब्रेक्ट (३३) आणि एडवर्ड्स (२५) यांनी ४१ धावांची चांगली भागीदारी केली. बांगलादेशकडून २१ वर्षीय लेगस्पिनर रिशाद हुसेनने सर्वाधिक तीन बळी टिपले. त्यानंतर मुस्तफिझूर रहमानच्या (१/१२) किफायतशीर गोलंदाजीमुळे बांगलादेशने दमदार पुनरागमन केले.

बांगलादेशने नेदरलँड्सवर २५ धावांनी विजय मिळवल्याने श्रीलंका संघ यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतून बाहेर पडला. ड गटातील तीन सामन्यांमध्ये तीन विजयांसह दक्षिण आफ्रिका सुपर ८साठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला आहे. बांगलादेश तीन सामन्यांत दोन विजय आणि ०.४७८च्या नेट रन रेटसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर नेदरलँड्सचा नेट रन रेट एका विजयासह -०.४०८ आहे. नेपाळचा एक सामना पावसाने रद्द झाला आणि संघाने एक सामना गमावला. हा संघ चौथ्या स्थानावर आहे, तर श्रीलंकेने तीनपैकी पहिले दोन सामने गमावले. त्यांना नेपाळविरुद्ध कोणत्याही किमतीत विजय मिळवायचा होता, मात्र पावसामुळे हा सामना रद्द झाला. आता श्रीलंकेचा शेवटचा सामना नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे, जो जिंकला तरी त्यांना केवळ तीन गुणच गाठता येतील, जे सुपर ८मध्ये जाण्यासाठी पुरेसे नाही.

# आंतरराष्ट्रीय रेफ्री सेमिनारसाठी तुषार सिनलकर यांची निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मलेशिया येथे होणाऱ्या क्युरोगी आणि पुमसे आंतरराष्ट्रीय रेफ्री सेमिनारमध्ये भाग घेण्यासाठी तुषार सिनलकर यांची निवड झाली आहे.



तुषार सिनलकर यांचा तायक्वांदोमधील प्रवास प्रेरणादायी आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्यांनी ३०हून अधिक राष्ट्रीय खेळाडू आणि चार आंतरराष्ट्रीय खेळाडूंना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रशिक्षकाची भूमिका त्यांनी यापूर्वीच बजावली आहे. याव्यतिरिक्त भारतीय क्रीडा प्राधिकरणाद्वारे त्यांच्या खेळाडूंची निवड मार्गदर्शनाची गुणवत्ता आणि प्रभाव अधोरेखित करते.

याबद्दल इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष अनिल झोडगे, महासचिव संदीप ओंबासे, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, सीईओ गफ्फार पठाण यांनी व राज्यातील जिल्हा संघटनांनी तुषार सिनलकर यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# न्यूयॉर्कचे नासाऊ काउंटी क्रिकेट स्टेडियमचे पाडकाम

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सामन्यात भारताने अमेरिकेचा सात गडी राखून पराभव केला. हा सामना न्यूयॉर्कच्या नासाऊ काउंटी क्रिकेट स्टेडियमवर खेळवला गेला. भारत आणि अमेरिका यांच्यातील सामन्यासह न्यूयॉर्कमधील टी-२० विश्वचषकाचे सर्व सामने संपले. आता हे स्टेडियम पाडण्यात येत आहे.

विश्वचषकाच्या सुरुवातीपासूनच नासाऊ काउंटी क्रिकेट इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडिमय चर्चेचा विषय राहिले. नासाऊचे ड्रॉप इन पिच हे या चर्चेमागील कारण आहे. आतापर्यंत या मैदानावर खेळलेले सर्व सामने लो स्कोअरिंगचे होते, पण न्यूयॉर्कच्या या अवघड खेळपट्टीवरही सर्वांत मोठी धावसंख्या म्हणजेच १११ धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करणारा भारत पहिलाच देश ठरला. हे मैदान अवघ्या १०६ दिवसांत तयार झाले. याबाबत अनेक चर्चाही झाल्या. आता हे स्टेडियम पाडण्याचे काम सुरू झाले आहे.

नासाऊ काउंटी स्टेडियमच्या बांधकामावर ३० दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २४८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे आंतरराष्ट्रीय स्टेडियम तयार करण्यासाठी १०६ दिवस लागले, जे आता सहा आठवड्यात पाडण्यात येणार आहे. क्रिकबझच्या वृत्तानुसार भारत आणि अमेरिका यांच्यातील सामन्यानंतर हे स्टेडियम पाडण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या स्टेडियमच्या खेळपट्ट्यांबाबत आयसीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, जर नासाऊ काउंटीच्या अधिकाऱ्यांना या खेळपट्ट्या ठेवायच्या असतील, तर ते तसे करू शकतात आणि नको असल्यास या खेळपट्ट्या परत पाठवल्या जातील.


याआधी नॉर्थ कॅरोलिना येथील मॉरिसविलेबद्दलही चर्चा करण्यात आली होती, पण लॉजिस्टिक्स व पर्यावरणाचे कमी नुकसान यामुळे नासाऊ काउंटीची निवड करण्यात आली. न्यूयॉर्क शहरापासून ते खूप लांब आहे. टी-२० वर्ल्डकपसाठी स्टेडियम बांधण्यासाठी आयसीसीने ही जागा भाडेतत्त्वावर घेतली होती.

# अमेरिकेत ‘सूर्या’चा रोमँटिक अंदाज! पत्नीसोबत भटकंती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा स्टार खेळाडू सूर्यकुमार यादव ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या संघाचा भाग आहे. पहिल्या दोन सामन्यांमध्ये संघर्ष करताना दिसलेला सूर्या अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात चमकला. त्याने संयमी खेळी करून भारताला विजय मिळवून दिला.





सध्या सूर्यकुमार आणि त्याची पत्नी देविशा शेट्टी अमेरिकेच्या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेताना दिसत आहे. देविशा शेट्टीने अमेरिकेतील भटकंती शेअर केली आहे.

भारताने सुरुवातीचे तीन सामने जिंकून सुपर ८ फेरीत प्रवेश केला. दरम्यान, विश्वचषकाच्या रणधुमाळीत सूर्या त्याची पत्नी देविशासोबत न्यूयॉर्क येथे भटकंती करीत आहे. सूर्याच्या पत्नीने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून याचे फोटो शेअर केले आहेत. सूर्या आणि देविशा यांनी अमेरिकेतील खाद्यपदार्थांचा आनंद लुटला.

सूर्यकुमार यादवने आयसीसी ट्वेन्टी-२० क्रमवारीत आपला दबदबा कायम ठेवला आहे. तो जगातील नंबर वन टी-२० फलंदाज आहे. सूर्यकुमारने मागील मोठ्या कालावधीपासून झटपट क्रिकेटमध्ये प्रभावी कामगिरी केली.

सूर्या आणि देविशा यांची पहिली भेट २०१२मध्ये मुंबईच्या पोद्दार डिग्री कॉलेजमध्ये झाली होती. तेव्हा सूर्या बीकॉमच्या पहिल्या वर्षाचा विद्यार्थी होता आणि देवीशा बारावी पास होती. तेव्हा सूर्याचे वय २२, तर देविशा १९ वर्षांची होती.

कॉलेजमध्ये असतानाच सूर्याला देविशाचा डान्स खूप आवडला आणि तो तिच्या प्रेमात पडला, तर देविशादेखील सूर्याच्या फलंदाजीच्या शैलीमुळे प्रभावित झाली होती. तेव्हापासून दोघांनी जवळपास पाच वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर २०१६मध्ये लग्न केले. सध्या त्यांचा सुखी संसार सुरू आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com